दैनिक
राष्ट्रसह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ३९ । बुधवार १८ नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक



धोनी आयपीएलमधून निवृत्त

चेन्नई : भारतीय क्रिकेटचा माजी कर्णधार आणि चेन्नई सुपर किंग्सचा आधारस्तंभ महेंद्रसिंग धोनी आयपीएलमधून खेळाडू म्हणून निवृत्त होणार असल्याची माहिती समोर आली आहे. आयपीएल २०२७ मध्ये तो मैदानावर खेळाडू म्हणून नव्हे, तर सीएसकेच्या मेंटॉरच्या भूमिकेत दिसणार असल्याचे सांगण्यात येत आहे.सीएसकेच्या मालकीण रूपा गुरुनाथ यांनी धोनीच्या निवृत्तीचा किस्सा सांगितला. आगामी हंगामासाठी खेळाडूंच्या निवडीबाबत व्हिडिओ कॉलवर बैठक सुरू असताना धोनीने शांतपणे 'माझे नावही त्या यादीत लिहा' असे सांगितले. त्याच्या या वक्तव्याने उपस्थितांना धक्का बसला. धोनीने आपल्या १९ वर्षांच्या आयपीएल कारकिर्दीत चेन्नईला पाच वेळा विजेतेपद मिळवून दिले. संघाला १३ वेळा प्लेऑफ आणि ११ वेळा अंतिम फेरीत पोहोचवण्यात त्याचा मोठा वाटा राहिला. आयपीएलमध्ये त्याने ५,४३९ धावा केल्या असून ३८.३० ची सरासरी आणि १३७.४५ चा स्ट्राइक रेट नोंदवला आहे.

अर्थसंकल्पाच्या आखणीत आता 'जेन झी'चा आवाज!

निर्मला सीतारामन पहिल्यांदाच तरुणांशी साधणार थेट संवाद; २०२७-२८ च्या अर्थसंकल्पपूर्व चर्चेत युवकांना स्वतंत्र स्थान

रोजगार, शिक्षण, स्टार्टअप आणि आर्थिक भविष्याबाबत तरुणांच्या अपेक्षा जाणून घेणार; बदलत्या युवा शक्तीची सरकारकडून दखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नवी दिल्ली : देशाच्या राजकारणापासून सामाजिक चळवळींपर्यंत 'जेन झी' अर्थात नव्या पिढीचा प्रभाव वाढत असतानाच आता देशाच्या अर्थसंकल्पीय प्रक्रियेतही तरुणांचा आवाज ऐकू येणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२७-२८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या तयारीत प्रथमच तरुणांसाठी स्वतंत्र चर्चासत्र आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पपूर्व चर्चेत उद्योगपती, अर्थतज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींसोबत तरुणांनाही थेट आपली मते मांडण्याची संधी मिळणार आहे.

आजवर अर्थसंकल्पपूर्व चर्चेत प्रामुख्याने उद्योग संघटना, वित्तीय संस्था, शेतकरी, कामगार संघटना आणि अर्थतज्ज्ञांच्या सूचनांना महत्त्व दिले जात होते. मात्र, रोजगार, शिक्षण, कौशल्यविकास, स्टार्टअप, तंत्रज्ञान आणि बदलती अर्थव्यवस्था यांचा थेट परिणाम ज्यांच्या भविष्यावर होणार आहे, त्या तरुणांचाही धोरणनिर्मितीत सहभाग असावा, या दृष्टिकोनातून हा पुढाकार म हत्त्वाचा मानला जात आहे.



या विशेष चर्चासत्रात तरुणांच्या रोजगाराच्या संधी, शिक्षण व्यवस्था, कौशल्यविकास, स्टार्टअप्स, उद्योगनिर्मिती आणि आर्थिक स्वावलंबन यांसारख्या विषयांवर मते जाणून घेतली जाणार आहेत. याशिवाय पश्चिम आशियातील संघर्ष, वाढत्या तेलाच्या किमती आणि जागतिक आर्थिक अस्थिरतेचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम यावरही अर्थतज्ज्ञांशी चर्चा होणार आहे.

दरम्यान, आगामी अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर निर्मला सीतारामन यांनी सोम वारी अर्थतज्ज्ञांसोबत पहिली बैठक घेतली. आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव, मुख्य आर्थिक सल्लागार आणि वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. भांडवली बाजार, बँकिंग, विमा, ऊर्जा, आरोग्य, पायाभूत सुविधा, उत्पादन आणि सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग क्षेत्रांतील प्रतिनिधींच्याही सूचना घेतल्या जाणार आहेत.

युवा शक्ती केवळ निवडणुकीतील मतदार न राहता देशाच्या आर्थिक धोरणनिर्मितीतील भागीदार बनणार का, याची उत्सुकता आता निर्माण झाली आहे.

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर

डॉ. सुजय विखे मुख्यमंत्र्यांच्या भेटीला!

देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अभिनंदन; सहकार क्षेत्र आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणावर चर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. सुजय विखे पाटील यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत मुख्यमंत्र्यांचे आशीर्वाद घेत त्यांनी जिल्ह्यातील सहकार क्षेत्राची सद्यस्थिती, शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ आणि ग्रामीण विकासातील जिल्हा बँकेची भूमिका यासह विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर डॉ. विखे यांनी घेतलेली मुख्यमंत्र्यांची ही भेट राजकीय आणि सहकार क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे. जिल्ह्यातील सहकार चळवळीला अधिक बळकटी देणे, सहकारी संस्थांचे आर्थिक सक्षमीकरण करणे तसेच जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक प्रभावी आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याबाबत यावेळी विचारविनिमय झाला.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्राच्या विकासात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची भूमिका महत्त्वाची आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीत बँकेच्या कामकाजाला अधिक गतिमानता देणे, शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजांना प्राधान्य देणे आणि सहकारी संस्थांचे जाळे अधिक सक्षम करणे, या दृष्टीने आगामी काळात बँकेसमोर असलेल्या संधी आणि आव्हानांवरही चर्चा झाल्याचे समजते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. सुजय विखे पाटील यांचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली चांगले काम घडावे, अशा शुभेच्छा दिल्या.मुख्यमंत्र्यांकडून मिळालेले मार्गदर्शन आणि शुभेच्छा आपल्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याची भावना डॉ. सुजय विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्हा बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्राला नवी दिशा देण्याची आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रभावी काम करण्याची जबाबदारी आता त्यांच्या नेतृत्वावर असणार आहे.

शिर्डी विमानतळ परिसरात होणार भव्य पंचतारांकित हॉटेल

'एमएडीसी' व 'ताज समूहा'त ऐतिहासिक सामंजस्य करार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील प्रमुख धार्मिक पर्यटनस्थळ असलेल्या शिर्डीच्या विकासात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, शिर्डी विमानतळ परिसरात जागतिक दर्जाचे पंचतारांकि हॉटेल उभारण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी आणि दी इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेड (ताज समूह) यांच्यात एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि त्यांच्याच हस्ते पार पडलेल्या या करारामुळे शिर्डीच्या पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राला नवी झळाळी मिळणार आहे.

देश-विदेशातून शिर्डीमध्ये दाखल होणाऱ्या साईभक्तांसह विमान प्रवाशांना आता या प्रकल्पामुळे जागतिक दर्जाच्या निवास आणि आदरातिथ्य सुविधा सुलभतेने उपलब्ध होणार आहेत. शिर्डी हे केवळ देशातीलच नव्हे तर जगातील एक प्रमुख धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून



ओळखले जाते. येथे वर्षभरात कोट्यवधी भाविक दर्शनासाठी येतात. विमानतळाच्या विकासासोबतच या परिसराचा समग्र विकास साधत प्रवाशांना उच्च दर्जाच्या सोयीसुविधा निर्माण करून देण्यावर राज्य शासनाचा विशेष भर असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.या म हत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे शिर्डीतील पर्यटनवाढीला अभूतपूर्व चालना मिळणार आहे. पर्यटकांचा ओघ वाढल्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी बळकटी मिळणार असून, परिसरातील व्यापार, वाहतूक आणि अन्य संबंधित क्षेत्रांना गती येईल. तसेच, या हॉटेलच्या माध्यमातून स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या व व्यवसायाच्या अनेक नव्या संधी निर्माण होतील, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

हा सामंजस्य करार अत्यंत उच्चस्तरीय मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी वनमंत्री गणेश नाईक, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, तसेच म हाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे (पान ४ वर)

गुहा शाळेचे मुख्याध्यापक अन्सार पठाण निलंबित !

बोगस विद्यार्थी नोंदणी, खोटी हजेरी आणि शासकीय कामकाजात हलगर्जीपणाचे गंभीर आरोप

राहुरी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून निलंबन आदेशाची बजावणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांम धील कथित बोगस विद्यार्थी नोंदणी आणि पटसंख्या फेरफार प्रकरणाला आता मोठे वळण मिळाले आहे. गुहा ता.राहुरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अन्सार गुलाब पठाण यांना निलंबित करण्यात आले आहे. राहुरी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने आज सकाळी त्यांना निलंबनाचा आदेश बजावला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

अन्सार पठाण यांच्याविरोधात करण्यात आलेल्या चौकशीत अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्याचे निलंबन आदेशात नमूद करण्यात आले आहे. शाळेत विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित नसतानाही बोगस हजेरी लावणे,विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत नसतानाही विद्यार्थ्यांच्या दाखल्याची नोंदणी करणे, विद्यार्थी हजेरीपटावर खोटी माहिती नोंदविणे, शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना न करणे, शालेय कामकाज व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी न करणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांशी उद्धट वर्तन करणे तसेच शासकीय दप्तर तपासणीस नकार देणे, असे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत.

निलंबन कालावधीत पठाण यांनी नेवासा पंचायत समिती येथे हजेरी लावण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, राहुरी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची अतिरिक्त पदे वाचविण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत कथित फेरफार करून बोगस विद्यार्थी दाखविण्याचा प्रकार समोर आला होता. एका शाळेत विद्यार्थ्यांचे दाखले दाखवायचे आणि प्रत्यक्ष शिक्षण मात्र दुसऱ्याच शाळेत घ्यायचे, असा धक्कादायक प्रकार या चौकशीत उघडकीस आला. या प्रकरणामुळे शिक्षण विभागात मोठी खळबळ उडाली असून, तालुक्यातील आठ शाळांचे मुख्याध्यापक आणि सहा शिक्षक प्रशासनाच्या रडारवर आले आहेत.

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची पदे निश्चित करताना विद्यार्थ्यांची पटसंख्या महत्त्वाची ठरते. पटसंख्या कमी झाल्यास शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरण्याची शक्यता असल्याने काही शाळांनी अन्य शाळांतील विद्यार्थ्यांचे दाखले स्वतःच्या शाळेत दाखविल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. या प्रकरणात काही शिक्षकांच्या पत्नी व नातेवाईक संबंधित शाळांमध्ये कार्यरत असल्याची बाबही तपासात समोर आली होती.

सामाजिक कार्यकर्ते अरुण वाबळे यांनी माहिती अधिकारातून माहिती मिळवून हा प्रकार उघडकीस आणला. एका शाळेची कागदोपत्री पटसंख्या १४ असताना अन्य आठ शाळांमधील विद्यार्थ्यांचे दाखले आणल्याचे निदर्शनास आले. विशेष म्हणजे, काही विद्यार्थ्यांच्या पालकांनाही आपली मुले संबंधित शाळेत कधी दाखल झाली, याची माहिती नसल्याचे समोर आले.

त्यानंतर गटशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले यांनी वरीष्ठांच्या आदेशानुसार तक्रारींची चौकशी केली. संबंधित शाळांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी हजेरी, प्रवेश नोंदी, हजेरी पुस्तके आणि परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान काही विद्यार्थ्यांची नावे हजेरीपटावर नसणे, हजेरी पुस्तकांमध्ये खाडाखोड करणे तसेच काही ठिकाणी पाने फाडून (पान ४ वर)

वाबळे यांच्या तक्रारीत तथ्य आढळल्याने मुख्याध्यापकाचे निलंबन

या प्रकरणी वरीष्ठांकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची वरीष्ठांच्या लेखी आदेशान्वये चौकशी करण्यात आली. गटशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले यांनी संबंधित शाळांची प्रत्यक्ष तपासणी केली. विद्यार्थ्यांची उपस्थिती, परीक्षा पेपर आणि दाखल्यांच्या नोंदींची पडताळणी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल जिल्हा परिषद प्रशासनाकडे सादर केला होता. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाने गुहा शाळेचे मुख्याध्यापक अन्सार पठाण यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

खासगी शाळांच्या प्रवेश प्रक्रियेत डोनेशन, मुलाखतींना बंदी!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : खासगी शाळांमध्ये नर्सरी, केजी आणि पहिलीच्या प्रवेशासाठी पालकांची होणारी आर्थिक लूट रोखण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. प्रवेशाच्या वेळी मुलांच्या मुलाखती, लेखी किंवा तोंडी परीक्षा घेण्यास बंदी घालण्यात आली असून, डोनेशन, कॅपिटेशन फी आणि अनधिकृत शुल्क आकारण्यासही मनाई करण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाने यासंदर्भात चार पानी नियमावली (एसओपी) जारी केली आहे.

नर्सरी ते पहिलीच्या प्रवेशासाठी राज्य सरकारची नवी नियमावली; नियम मोडणाऱ्या शाळांवर कारवाई

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी जारी केलेले निर्देश राज्यातील मान्यताप्राप्त विनाअनुदानित खासगी शाळांना लागू असतील. प्रवेशासाठी आयकर विवरणपत्र, उत्पन्नाचा दाखला किंवा कुटुंबाचे फोटो मागता येणार नाहीत. गणवेश, पुस्तके आणि प्रवेश प्रक्रियेच्या नावाखाली सक्तीने शुल्क वसूल करण्यासही बंदी आहे. उपलब्ध जागांपेक्षा अधिक अर्ज आल्यास पारदर्शक लॉटरी पद्धतीने प्रवेश द्यावा लागणार आहे. प्रवेशाचे वेळापत्रक वेबसाइट व नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करून अर्जासाठी किमान सात कामकाजाचे दिवस द्यावे लागतील. विशिष्ट प्रकाशकांची पुस्तके खरेदी करण्याची सक्तीही करता येणार नाही. दरम्यान, नव्या वयाच्या निकषांनुसार नर्सरीसाठी ३, ज्युनिअर केजीसाठी ४, सीनियर केजीसाठी ५ आणि पहिलीसाठी ६ वर्षे वय निश्चित केले आहे. हे निकष टप्प्याटप्प्याने २०२७-२८ ते २०३०-३१ या शैक्षणिक वर्षांपासून लागू होतील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर शिक्षण विभागाकडून प्रशासकीय व दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

बंधाऱ्यांत पाण्यासाठी शेतकऱ्यांचे 'शोले स्टाईल' आंदोलन!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

महांकळवाडगाव, सराला गोवर्धन, रामपूर, वांजरगाव येथे शेतकरी टाक्यांवर चढले; उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावल्याने आंदोलन तीव्र

माळवाडगाव : गोदावरी नदीवरील वैजापूर व श्रीरामपूर तालुक्यांच्या लाभक्षेत्रातील वांजरगाव, खानापूर आणि कमालपूर हे तीन कोरडे केटीवेअर बंधारे पिण्याच्या पाण्यासाठी किमान ५० टक्के भरून द्यावेत, या मागणीसाठी नागमठाण पुलावर सुरू असलेल्या आमरण उपोषणाचा मंगळवारी (दि. १७) सातवा दिवस होता. दहा उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी महांकळवाडगाव, सराला गोवर्धन, रामपूर आणि वांजरगाव येथे पाण्याच्या टाक्यांवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन केले. या आंदोलनामुळे प्रशासकीय यंत्रणेसह श्रीरामपूर आणि वैजापूर तालुक्यातील पोलिसांची धावपळ उडाली.

गोदावरी नदीवरील बंधाऱ्यांत पाणी सोडण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी यापूर्वी सप्टेंबर महिन्यात नागमठाण पुलावर आत्मदहन आंदोलन केले होते. त्यानंतर ११ नोव्हेंबरपासून शेतकरी संघटनेचे वैजापूर तालुकाध्यक्ष गणेश तांबे यांच्यासह सर्वपक्षीय शेतकऱ्यांनी आमरण उपोषण सुरू केले. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठीही अनेक शेतकरी उपोषणस्थळी बसले आहेत.



याशिवाय कमालपूर आणि नाऊर येथे रास्ता रोको आंदोलनही करण्यात आले होते.

मंगळवारी उपोषणकर्त्यांची प्रकृती अधिक खालावल्याने उपोषणस्थळी उपस्थित शेतकरी संतप्त झाले. जलसंपदा आणि महसूल विभागाकडून अद्याप ठोस निर्णय घेतला जात नसल्याने गोदाकाठच्या गावांतील शेतकऱ्यांनी आपापल्या गावांत जाऊन पाण्याच्या टाक्यांवर चढून आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. रामपूर येथे सर्वप्रथम आंदोलन सुरू झाले. त्यानंतर म हांकळवाडगाव, सराला गोवर्धन आणि वांजरगाव (ता. वैजापूर) येथेही (पान ४ वर)

पुन्हा पाणी सोडताना १४४ कलम लागू करा

गोदावरी नदीवरील बंधारे भरण्यासाठी सप्टेंबर महिन्यात नांदूर-मधमेश्वर धरणातून १२० एम सीएफटी पाणी सोडण्यात आले होते. मात्र, कोपरगाव आणि राहाता तालुक्यांतील केटीवेअर बंधाऱ्यांतून हे पाणी पुढे वैजापूर व श्रीरामपूर तालुक्यांतील बंधाऱ्यांपर्यंत पोहोचले नाही. त्यामुळे खालचे बंधारे कोरडेच राहिले. परिणामी, महिनाभरापासून आंदोलन आणि उपोषण सुरू आहे. दरम्यान, वरील बंधाऱ्यांतील पाण्याची पातळीही आता ५० टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. या पार्श्वभूमीवर पुन्हा १२० एमसीएफटी पाणी सोडण्याच्या हालचाली सुरू असल्याचे सम जते. मात्र, यावेळीही पूर्वीसारखी परिस्थिती निम र्ण होऊ नये, यासाठी जायकवाडी धरणात पाणी सोडताना लागू केलेल्या १४४ कलमाच्या धर्तीवर बंधाऱ्यांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करावेत आणि पोलीस बंदोबस्तात पाणी खाली आणावे. तसेच वैजापूर व श्रीरामपूर तालुक्यांतील कोरडे बंधारे किमान ५० टक्के भरून द्यावेत, अशी मागणी आंदोलक शेतकऱ्यांनी केली आहे.

मोबाईलच्या पडद्याआड हरवतेय माणुसकी !

चिमुकल्यांपासून ज्येष्ठांपर्यंत मोबाईलचा विळखा; डिजिटल प्रगतीसोबत मानसिक आरोग्य, कौटुंबिक संवाद आणि सामाजिक स्वास्थ्य जपण्याचे आव्हान

छत्रपती संभाजीनगरमध्ये पंचाहत्तरी पार केलेल्या एका आजीला इन्स्टाग्रामवरील रील्स पाहण्याचे इतके व्यसन जडले की, कुटुंबीयांनी मोबाईल काढून घेतल्यानंतर त्यांची मानसिक अवस्था बिघडली. उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली. पंधरा दिवसांच्या उपचारानंतर त्यांची प्रकृती सुधारली. उपचार सुरू असताना रुग्णालयातील इतर रुग्णांचे मोबाईलही त्यांनी उशीत लपवून ठेवल्याची घटना समोर आली. प्रथमदर्शनी ही घटना विनोदी किंवा आश्चर्यकारक वाटू शकते; मात्र तिच्या मुळाशी असलेला सामाजिक प्रश्न अत्यंत गंभीर आहे. मोबाईलचे व्यसन आता वय, शिक्षण, आर्थिक परिस्थिती किंवा सामाजिक स्तर यांचे बंधन मानत नाही. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत प्रत्येक वयोगटाला त्याने आपल्या विळख्यात घेतले आहे.

एकेकाळी मोबाईल हे संपर्काचे साधन होते. आज तो मनोरंजन, व्यवहार, शिक्षण, माहिती, नातेसंबंध आणि विरंगुळ्याचे केंद्र बनला आहे. तंत्रज्ञानाने माणसाचे जग जवळ आणले; परंतु त्याचवेळी माणसामाणसांतील प्रत्यक्ष संवाद मात्र कमी केला. घरातील चार सदस्य एकत्र बसलेले असतात; पण प्रत्येकाचे डोळे वेगवेगळ्या मोबाईलच्या पडद्यावर खिळलेले असतात. एकाच घरात राहणारी माणसे एकमेकांशी बोलण्यापेक्षा सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी अधिक वेळ संवाद साधतात, ही आजच्या कुटुंबव्यवस्थेची विसंगती आहे.

भारतातील डिजिटल क्रांती किती वेगाने विस्तारली आहे, हे सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट होते. केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मे २०२५ मधील सर्वेक्षणानुसार, देशातील तब्बल ८५.५ टक्के कुटुंबांकडे किमान एक स्मार्टफोन आहे. १५ ते २९ वयोगटातील ग्रामीण भागातील ९२.७ टक्के, तर शहरी भागातील ९५.७ टक्के तरुणांनी मागील तीन महिन्यांत इंटरनेटचा वापर केल्याचे नोंदवले आहे. इंटरनेट अँड मोबाईल असोसिएशन ऑफ इंडिया आणि कांतर यांच्या अहवालानुसार २०२४ मध्ये देशातील इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या ८८.६ कोटींवर पोहोचली होती. २०२५ मध्ये ती ९० कोटींचा टप्पा ओलांडेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता.

जागतिक स्तरावरील संशोधनही चिंताजनक चित्र मांडते. २०२४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका आंतरराष्ट्रीय संशोधनात २०१२ ते २०२२ या कालावधीतील ९७ हजार ७४८ व्यक्तींचा समावेश असलेल्या १०९ अभ्यासांचे विश्लेषण करण्यात आले. त्यात समस्यात्मक स्मार्टफोन वापराचे जागतिक प्रमाण ३७.१ टक्के आढळले. विशेष म्हणजे, वाढत्या वयोगटांमध्येही अशा वापराचे प्रमाण वाढत असल्याचे संशोधनात नमूद करण्यात आले आहे.

भारतातील १८ ते ४० वयोगटातील १२ हजार २८६ प्रौढांचा समावेश असलेल्या दहा अभ्यासांच्या विश्लेषणात इंटरनेटच्या व्यसनाची कोणतीही पातळी आढळण्याचे एकत्रित प्रमाण ५८.३४ टक्के नोंदवण्यात आले. मात्र, ही आकडेवारी संपूर्ण भारतीय लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

ही आकडेवारी मोबाईलचा वापर करणारा प्रत्येक व्यक्ती व्यसनाधीन आहे, असे सिद्ध करत नाही. मात्र, तंत्रज्ञानाच्या अतिवापराचा धोका किती व्यापक झाला आहे, याची जाणीव निश्चितपणे करून देते.

मोबाईलच्या व्यसनामागे केवळ वापरकर्त्यांची इच्छाशक्ती कमी असणे हे कारण नाही. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची रचनाच वापरकर्त्यांना अधिकाधिक वेळ गुंतवून ठेवणारी असते. सतत समोर येणाऱ्या नव्या रील्स, आवडीचे व्हिडिओ, नोटिफिकेशन्स, लाईक्स आणि कमेंट्स यामुळे वापरकर्त्याला मोबाईल पुन्हा पुन्हा हातात घेण्याची सवय लागते. एक व्हिडिओ पाहण्यासाठी सुरू केलेला प्रवास कधी तासभर चालतो, हेही लक्षात येत नाही.

लहान मुलांच्या बाबतीत ही समस्या अधिक गंभीर आहे. रडणाऱ्या मुलाला शांत करण्यासाठी, जेवण भरवण्यासाठी किंवा पालकांना काम करता यावे म्हणून त्यांच्या हातात मोबाईल दिला जातो. सुरुवातीला सोयीचा वाटणारा हा उपाय पुढे सवय बनतो. मैदानी खेळ, मित्रांसोबतचा संवाद, वाचन, चित्रकला आणि कल्पनाशक्तीला चालना देणाऱ्या कृती मागे पडतात. मोबाईल मिळाला नाही तर चिडचिड, हट्ट आणि अस्वस्थता दिसू लागते.

तरुणाईमध्ये रील्स, गेमिंग, ऑनलाइन मनोरंजन आणि सतत सोशल मीडियावर सक्रिय राहण्याची स्पर्धा सुरू आहे. अभ्यास, नोकरी, व्यवसाय आणि झोपेच्या वेळेवर त्याचा परिणाम होतो. दुसऱ्यांचे आकर्षक आयुष्य पाहून स्वतःच्या आयुष्याबद्दल न्यूनगंड निर्माण होणे, आभासी लोकप्रियतेच्या मागे धावणे आणि प्रत्यक्ष नात्यांकडे दुर्लक्ष करणे, हेही त्याचे दुष्परिणाम आहेत.

संभाजीनगरमधील आजीची घटना या समस्येचा वेगळा पैलू समोर आणते. मुलं नोकरी-व्यवसायासाठी बाहेर, नातवंडे शिक्षणात व्यस्त आणि घरातील ज्येष्ठ व्यक्ती दिवसभर एकट्या, असे चित्र अनेक कुटुंबांमध्ये आहे. निवृत्तीनंतर कमी झालेला दिनक्रम, मित्रपरिवाराशी कमी होणारा संपर्क आणि संवादाचा अभाव यामुळे ज्येष्ठ नागरिक मोबाईलकडे वळतात. धार्मिक प्रवचने, बातम्या, व्हॉट्सअॅप आणि रील्स त्यांचा विरंगुळा बनतात. यात गैर काहीच नाही; पण मोबाईल हा माणसांच्या सहवासाचा पर्याय बनू लागला, तर प्रश्न निर्माण होतो.

ज्येष्ठांना मोबाईल वापरू देऊ नये, असा या घटनेचा अर्थ नाही. उलट त्यांना डिजिटल साक्षर करणे, ऑनलाइन फसवणुकीपासून सावध करणे आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर शिकवणे आवश्यक आहे. मात्र, त्यांना वेळ देणे, त्यांच्या अडचणी ऐकणे, त्यांच्यासोबत फिरायला जाणे आणि गप्पा मारणे याला पर्याय नाही.

मोबाईलच्या समस्येवर केवळ मोबाईल बंद करणे हा उपाय नाही. कारण आधुनिक जीवनात त्याची गरज नाकारता येणार नाही. गरज आहे ती वापरावर नियंत्रण ठेवण्याची आणि डिजिटल शिस्त निर्माण करण्याची.

घरात जेवताना आणि कौटुंबिक संवादाच्या वेळी मोबाईल बाजूला ठेवावा. लहान मुलांना वयानुसार स्क्रीन वापरण्याची मर्यादा घालावी. पालकांनीही स्वतःच्या मोबाईल वापरावर नियंत्रण ठेवावे. मुलांना मैदानी खेळ, वाचन, कला आणि प्रत्यक्ष सामाजिक सहभागासाठी प्रोत्साहन द्यावे. ज्येष्ठ नागरिकांसाठी फिरणे, भजन, वाचन, मित्रमंडळींच्या भेटी आणि सामूहिक उपक्रमांचे नियोजन करावे. शाळा आणि महाविद्यालयांनी डिजिटल व्यसन, सायबर सुरक्षितता आणि मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करावी. मोबाईल न मिळाल्यास तीव्र अस्वस्थता, झोपेचा अभाव, दैनंदिन कामांवर परिणाम किंवा आक्रमक वर्तन दिसत असल्यास मानसोपचार तज्ज्ञांची मदत घ्यावी. अशा उपाययोजनांचा प्रत्येकाने अवलंब करायला हवा.

सरकारनेही डिजिटल व्यसनाच्या वाढत्या समस्येकडे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. शाळांमध्ये समुपदेशन, पालकांसाठी मार्गदर्शन आणि व्यसनाच्या लक्षणांची ओळख करून देणाऱ्या मोहिमा राबविणे आवश्यक आहे.

शेवटी प्रश्न मोबाईल चांगला की वाईट, हा नाही. प्रश्न आहे मोबाईल आपल्या हातात आहे की आपण मोबाईलच्या हातात आहोत, हा! संभाजीनगरमधील आजीबाईंची घटना ही एका कुटुंबापुरती मर्यादित नाही. ती प्रत्येक घरासाठी धोक्याची घंटा आहे. मुलांच्या हातातून मोबाईल काढून घेण्यापूर्वी पालकांनी स्वतःच्या हातातील मोबाईलकडे पाहावे. ज्येष्ठांना मोबाईलपासून दूर करण्यापूर्वी त्यांचा एकटेपणा दूर करावा. कारण स्क्रीनवर हजारो चेहरे दिसू शकतात; पण संकटाच्या वेळी आधार देणारा हात आभासी जगात मिळत नाही. मोबाईलने जग जोडले, पण त्याने माणसांना माणसांपासून तोडू नये, एवढीच अपेक्षा!

वैद्यकीय सेवेसह विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. मनिषा वाघ यांचा गौरव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : वैद्यकीय व्यवसाय सांभाळुन सामाजिक व धार्मिक क्षेत्रात करत असलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल भाजपा वैद्यकीय आघाडीच्या राज्य उपाध्यक्ष नगरपंचायतच्या नगरसेविका स्त्री रोग तज्ञ डॉ.सौ.मनिषा भाऊसाहेब वाघ यांचा नेवासा मेडिकल असोसिएशनच्या वतीने नुकताच सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



डॉ.मनिषा वाघ यांनी वैद्यकीय क्षेत्रातील विविध उपक्रमांना चालना देत उत्कृष्ट कार्य केले आहे. वैद्यकीय सेवेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत धार्मिक व सामाजिक कार्यातही त्यांनी आपले योगदान दिले आहे.

डॉ.मनिषा वाघ यांच्या झालेल्या सन्मान सोहळयाच्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्त्री रोग तज्ञ डॉ.विष्णू देवरे,जेष्ठ मार्गदर्शक डॉ.भाऊसाहेब घुले,डॉ. राजेंद्र शिर्के, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.किशोर गळनिंबकर, डॉ.निर्मला सांगळे,डॉ.गणेश नांदे, मेडिकल असोसिएशनचे खजिनदार डॉ.संदीप देशमुख,सक्रिय टीम सदस्य डॉ.वरुण देवरे यांच्यासह नेवासा मेडिकल असोसिएशनचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.मनिषा वाघ यांच्या या गौरवाबद्दल त्यांचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील,महिला आघाडीच्या मार्गदर्शक रत्नाताई लंघे, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले, डॉ.मानसी कांबळे, महिला मोर्चाच्या अध्यक्षा भारतीताई बेद्रे, मंगलताई काळे, कुलस्वामिनी भजनी मंडळाच्या मार्गदर्शक साधनाताई मुळे,उद्योजिका कल्पनाताई पोतदार यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

२ ते ६ डिसेंबर दरम्यान श्री ज्ञानेश्वर माऊली जीवनचरित्र कथेचा भव्य सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : ग्रंथराज ज्ञानेश्वरी आणि मराठी भाषेचे उगमस्थान असलेल्या नेवासाच्या आध्यात्मिक वैभवाचा आणि संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या अलौकिक जीवनकार्याचा परिचय पुढील पिढीला व्हावा तसेच नेवासा नगरीचा लौकिक राज्यभर पोहोचावा, या उद्देशाने पसायदान प्रतिष्ठाणच्या वतीने कैवल्यरत्न श्री संत ज्ञानेश्वर माऊली जीवनचरित्र कथेच्या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २ डिसेंबर ते ६ डिसेंबर २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत हा सोहळा पार पडणार आहे.

माजी खासदार स्व.तुकाराम गडाख पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ नेवासा येथील पसायदान प्रतिष्ठाणच्या माध्यमातून दरवर्षी हिंदू धर्मातील संत-महात्मे आणि थोर व्यक्तिमत्त्वांच्या जीवनचरित्रावर आधारित कथांचे आयोजन करण्यात येते. यंदा या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे

यावेळी नेवासा तालुक्याची जगभर ओळख निर्माण करणाऱ्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या जीवन चरित्र कथेची निवड करण्यात आली आहे. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून अवघ्या मानवजातीला ज्ञान, भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या माऊलींच्या या जीवनकार्याचा परिचय नव्या पिढीला व्हावा, हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश असल्याचे प्रतिष्ठानचे प्रमुख मनोज अण्णा पारखे यांनी सांगितले.

या पाच दिवसीय जीवनचरित्र कथेचे निरूपण श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे मठाधिपती व विश्वस्त ह.भ.प. वेदांताचार्य श्री देवीदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या सुश्राव्य वाणीतून होणार आहे. त्यांच्या अमृततुल्य वाणीतून संत ज्ञानेश्वर माऊलींचे जीवनकार्य, आध्यात्मिक विचार, भक्तिमार्ग आणि समाजाला दिलेला अनमोल संदेश भाविकांना अनुभवता येणार आहे.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दररोज नेवासा तालुक्यातील विविध गावांमधून भाकरी गोळा करून भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील सामूहिक सहभाग, अन्नदानाची परंपरा आणि सामाजिक एकोपा यांचा सुंदर संगम या उपक्रमातून घडणार आहे. त्याचबरोबर दररोज संत ज्ञानेश्वर माऊलींच्या जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगांचे सजीव देखावे सादर करण्यात येणार असून, हे देखावे भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहेत.



या भव्यदिव्य धार्मिक सोहळ्याला राज्यस्तरीय स्वरूप देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, युवा नेते सुजय विखे पाटील यांच्यासह जिल्ह्यातील सर्व भाजपा आमदारांना निमंत्रित करण्यात येणार असल्याची माहिती पसायदान प्रतिष्ठाणचे अध्यक्ष श्री मनोज पारखे यांनी दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नेवासा शहरातील सर्व तरुण मंडळे, धार्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे कार्यकर्ते, वारकरी संप्रदायातील भाविक तसेच तालुक्यातील विविध गावांमधील सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांना या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम केवळ धार्मिक कथा न राहता संपूर्ण नेवासा तालुक्याचा सामूहिक आध्यात्मिक आणि सांस्कृतिक उत्सव व्हावा, यासाठी प्रतिष्ठाणच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नेवासानगरीचा आध्यात्मिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, माऊलींच्या विचारांचा जागर करणे आणि या पवित्र भूमीची ओळख संपूर्ण महाराष्ट्रात अधिक व्यापक करणे, हा या पाच दिवसीय जीवनचरित्र कथेच्या आयोजनामागील आमचा संकल्प आहे. हा सोहळा संपूर्ण नेवासकरांचा असून, सर्वांनी आपला उत्सव समजून त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन पसायदान प्रतिष्ठाणचे अध्यक्ष मनोज पारखे यांनी केले.

कारखान्यांच्या प्रदूषणावर मर्यादा

२१ कोटी नागरिकांना स्वच्छ आरोग्यदायी हवा; गुजरातच्या यशस्वी प्रयोगाचा महाराष्ट्रात विस्तार

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : औद्योगिक विकासाच्या नावाखाली वाढणाऱ्या वायुप्रदूषणाला आळा घालण्यासाठी महाराष्ट्रात आता कारखान्यांच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवणारी आणि प्रदूषण कमी करणाऱ्या उद्योगांना आर्थिक लाभ देणारी नवी व्यवस्था लागू केली जाणार आहे. गुजरातमध्ये यशस्वी ठरलेल्या प्रयोगाचा महाराष्ट्रात विस्तार करण्यात येणार असून, त्यानंतर राजस्थानमध्येही ही पद्धत राबविली जाणार आहे.

'द अर्थशॉट प्राईझ'च्या वतीने सोमवारी मुंबईत आयोजित 'इम्पॅक्ट असेंब्ली'मध्ये या उपक्रमाची घोषणा करण्यात आली. या विस्तारामुळे महाराष्ट्र आणि राजस्थानमधील सुमारे २१ कोटी नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी हवा मिळण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

कारखान्यांमधून बाहेर पडणाऱ्या सूक्ष्म धूलिकणांमुळे (पार्टिक्युलेट मॅटर) हवेचे प्रदूषण वाढते. त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी गुजरातने जगात प्रथमच कारखान्यांच्या प्रदूषणाला मर्यादा घालून त्यावर आर्थिक देवाणघेवाणीची व्यवस्था निर्माण केली. या पद्धतीनुसार, कारखान्यांना एकूण किती प्रदूषण करता येईल, याची मर्यादा निश्चित केली जाते. ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा कमी प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांना त्यांच्या शिल्लक प्रदूषण परवानगीचा वापर इतर कारखान्यांना विकता येतो. त्यामुळे प्रदूषण कमी करणाऱ्या उद्योगांना आर्थिक लाभ मिळतो, तर अधिक प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना त्याचा आर्थिक भार सहन करावा लागतो. परिणामी, उद्योगांना प्रदूषण कमी करण्यासाठी तंत्रज्ञान आणि यंत्रणांमध्ये सुधारणा करण्याचे प्रोत्साहन मिळते.

गुजरातमध्ये यशस्वी ठरलेल्या या पद्धतीचा विस्तार करण्यासाठी 'एमिशन्स मार्केट ॲक्सिलरेटर' ही संस्था मदत करणार आहे. महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात या उपक्रमाची अंमलबजावणी केली जाईल. त्यानंतर राजस्थानमध्येही त्याचा विस्तार होणार आहे. विशेष म्हणजे, उद्योगांवर केवळ निर्बंध लादण्याऐवजी प्रदूषण कमी करणाऱ्या उद्योगांना आर्थिक प्रोत्साहन देऊन औद्योगिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांची सांगड घालण्याचा या उपक्रमाचा प्रयत्न आहे.

'लाडकी लेक'च्या शिक्षणाला आधार

आदिक परिवाराचा मायेचा हात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : सांस्कृतिक उपक्रमाला सामाजिक बांधिलकीची जोड देत माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक यांच्या पुढाकारातून आयोजित 'स्नेहभेट' कार्यक्रमात रास-दांडिया रिल्स स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. तसेच स्वर्गीय खासदार गोविंदरावजी आदिक यांच्या स्मरणार्थ राबविण्यात येणाऱ्या 'लाडकी लेक' आणि 'लाडकी बहीण' उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थिनी व निराधार महिलांना मदतीचा आधार देण्यात आला.

महाराष्ट्र कृषक समाज आणि आदिक परिवाराच्या वतीने शहरातील स्वयंवर मंगल कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव अविनाश आदिक यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. नवरात्रोत्सवातील पारंपरिक रास-दांडियाला आधुनिक माध्यमांची जोड देणाऱ्या या स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.

'लाडकी लेक' उपक्रमांतर्गत उंबरगाव येथील रचना दीपक ओहोळ हिला शिक्षणासाठी सायकल भेट देण्यात आली. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपलेल्या रचनाला शिक्षणासाठी ये-जा करणे सुलभ व्हावे, हा या मदतीमागील उद्देश आहे. तसेच उंदीरगाव येथील नूतन श्यामराव ताक आणि किशोरी बाळासाहेब ताक यांच्या नावे प्रत्येकी पाच हजार रुपयांच्या मुदत ठेवी करण्यात येणार आहेत. 'लाडकी बहीण' उपक्रमांतर्गत कौटुंबिक अडचणींचा सामना करणाऱ्या मेघना बिल्डीकर यांनाही आर्थिक मदतीसाठी मुदत ठेव देण्यात येणार आहे. यावेळी स्वर्गीय गोविंदराव आदिक यांच्या स्मरणार्थ 'लाडकी लेक' विशेष पुरस्कार, तर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ 'लाडकी बहीण' विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा राखी बिहानी, उपाध्यक्षा सुप्रिया भोसले, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, अशोकनाना कानडे, नारायण डावखर यांच्यासह सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. सांस्कृतिक कलागुणांचा गौरव करतानाच गरजूंच्या शिक्षणाला आणि महिलांच्या आर्थिक सुरक्षिततेला हातभार लावणारा हा उपक्रम लक्षवेधी ठरला.

पंचायत समितीच्या व्यापारी संकुलातील गाळे वाटप अनधिकृत?

६४ लाखांचे व्यवहार उघडकीस; विवेक माटा यांचा आरोप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : श्रीरामपूर पंचायत समितीच्या बीओटी तत्त्वावरील व्यापारी संकुलात अनधिकृत गाळे वाटप आणि लाखो रुपयांचे नियमबाह्य आर्थिक व्यवहार सुरू असल्याचा गंभीर आरोप युवा स्वाभिमान पक्षाचे जिल्हाध्यक्ष विवेक पारसकुमार माटा यांनी केला आहे. पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांसमवेत केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत एका व्यक्तीला प्रत्येकी ३२ लाख रुपये याप्रमाणे दोन गाळे देऊन ६४ लाखांचा व्यवहार झाल्याचे आणि संबंधित गाळ्यांमध्ये साहित्य ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आल्याचा दावा त्यांनी केला. तसेच काही व्यापाऱ्यांकडून ५५ ते ८५ लाख रुपयांपर्यंत आगाऊ रक्कम घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणात शासन निर्णयाचे उल्लंघन करून प्रशासनाची दिशाभूल केल्याचा आरोप करत संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे, अनधिकृत ताबे रद्द करावेत आणि सार्वजनिक लिलावाडरे गाळ्यांचे वाटप करावे, अशी मागणी माटा यांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनासह उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



निळवंडेच्या वितरिका क्र. ४ व टेल राईटचे उर्वरित काम युद्धपातळीवर पूर्ण करा; आ. आशुतोष काळेंच्या सूचना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी :- निळवंडे कालव्याच्या पाण्याचा परिसरातील बंधारे व पाझर तलाव भरण्यासाठी प्रभावी वापर व्हावा, यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्याच अनुषंगाने मंगळवार (दि.१७) रोजी त्यांनी निळवंडे कालव्याच्या वितरिका क्र.४ च्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून निळवंडे कालवा ते मंगलमूर्ती लॉन्स या मार्गावरील व टेल राईट वितरिका खोकड विहीर पॉईंटचे उर्वरित काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना पाटबंधारे विभागाचे अधिकारी व ठेकेदारांना दिल्या आहेत. निळवंडे कालव्यातून धोंडेवाडी, जवळके, बहादराबाद व शहापूर येथील बंधारे आणि पाझर तलाव भरता यावेत, यासाठी मंगलमूर्ती लॉन्स येथे व्हॉल्व्ह बसविण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली होती. त्याची दखल घेवून आमदार आशुतोष काळे यांनी निळवंडे कालव्याचे अधिकारी व शेतकऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन पाटबंधारे विभागाचे अधिकाऱ्यांना त्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यांच्या सूचनेनुसार वितरिका क्र. ४ वर मंगलमूर्ती लॉन्स येथे व्हॉल्व्ह बसविण्याचे काम पूर्ण झाले असून कालव्याच्या जोडणीचे कामही लवकरच पूर्ण होणार आहे. परंतु एका ठिकाणी डाळिंबाची बाग असलेल्या शेतातून पाईपलाइन टाकण्याचे काम अद्याप बाकी आहे. संबंधित शेतकऱ्याला योग्य मोबदला देऊन हे काम विनाविलंब पूर्ण करावे, अशा स्पष्ट सूचना आमदार आशुतोष काळे यांनी दिल्या. तसेच टेल राईट वितरिकेतून खोकड विहीर पॉईंट येथे २०० मीटर पाईपलाइन टाकून व्हॉल्व्ह बसविण्याचे कामही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.या कामामुळे परिसरातील बंधारे व पाझर तलावांमध्ये निळवंडे कालव्याचे पाणी सोडण्याचा मार्ग सुकर होणार असून, त्याचा परिसरातील शेतकऱ्यांना मोठा लाभ होणार आहे. यावेळी कृषी विभागाच्या सायली बेंडकुळे तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जल संपदाच्या यांत्रिकी विभागाकडून हिंगणी बंधाऱ्यासाठी १०० लोखंडी प्लेट्स

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : आ. आशुतोष काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून गोदावरी नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या लोखंडी प्लेट्ससाठी महायुती शासनाने ७.२९ कोटींचा निधी मंजूर केला आहे. यामध्ये माहेगाव देशमुख येथील बंधाऱ्यासाठी १ कोटी ४० लाख, हिंगणी बंधारा १ कोटी १० लाख, डाऊच ९० लाख, सडे ३४ लाख, शिंगवे ४५ लाख, पुणतांबा ५० लाख, वडगाव कानळद १ कोटी २० लाख तसेच निफाड तालुक्यातील येथील खेडलेझुंगे बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ४० लाख असा एकूण ७.२९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या व्यतिरिक्त जलसंपदा खात्याच्या यांत्रिकी विभागाने आ. आशुतोष काळे यांच्या मागणीनुसार तातडीने पाण्याची गळती रोखण्यासाठी हिंगणी बंधाऱ्याला १०० लोखंडी प्लेट्स उपलब्ध करून दिल्या आहे.

हिंगणी बंधाऱ्यांच्या लोखंडी प्लेट्स जुन्या झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होवून पाण्याचा अपव्यय होत होता. चालू वर्षी अतिशय कमी पर्जन्यमान झाले असल्याने बंधाऱ्यातील पाण्याची अजिबात गळती होऊ नये याची वेळीच खबरदारी घेवून आमदार आशुतोष काळे यांनी जलसंपदा विभागाकडे नवीन प्लेटची मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेवून जलसंपदा खात्याच्या यांत्रिकी विभागाने हिंगणी बंधाऱ्यांसाठी १०० नवीन लोखंडी प्लेट दिल्या आहे. या नवीन प्लेट्समुळे बंधाऱ्यातील पाण्याची गळती थांबली जाऊन जास्तीत जास्त पाणी शेती आणि जनावरांसाठी साठवले जाणार आहे. बंधाऱ्यात



पाणी साठल्याने शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्याबरोबरच भूजल पातळी वाढण्यास देखील मोठी मदत होईल. यामुळे हिंगणी बंधाऱ्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी तातडीने प्लेट उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे,जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांचे आभार मानले आहे.

ऊस उत्पादकांनी पाचट जाळू नये

आच्छादन करावे : शैलेश देशमुख



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

लोणी : यंदा अपुऱ्या पावसामुळे अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून त्याचा परिणाम ऊस पिकाच्या वाढीवर आणि उत्पादनावर होत आहे. अशा परिस्थितीत खोडवा उसातील पाचटाचे शास्त्रीय व्यवस्थापन शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे. पाचट न जाळता त्याचे आच्छादन केल्यास जमिनीतील ओलावा टिकून राहतो. त्यामुळे कमी पाण्यातही चांगले उत्पादन घेता येते. शेतकऱ्यांनी पाचट आच्छादन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी केले.

बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने दुष्काळी परिस्थितीत ऊस उत्पादकांसाठी पाचट व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. देशमुख म्हणाले, ऊस तोडल्यानंतर एकरी साधारण तीन ते चार टन पाचट उपलब्ध होते. ते जाळल्याने जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीव नष्ट होतात आणि सुपीकतेवर परिणाम होतो. पाचटाचे आच्छादन केल्यास बाष्पीभवन कमी होऊन जमिनीतील ओलावा टिकतो. पाचट कुजल्यानंतर सेंद्रिय कर्ब व अन्नद्रव्ये जमिनीत मिसळतात. तसेच तणांची वाढ कमी होऊन खुरपणीचा खर्च वाचतो.

ऊस तोडल्यानंतर पहिल्या १५ ते २० दिवसांत पाचट सरीत ओढून घ्यावे किंवा त्याची कुट्टी करावी. बुडखे मोकळे करून शिफारशीनुसार युरिया, सिंगल सुपर फॉस्फेट व पोटॅश द्यावे. पाचट लवकर कुजण्यासाठी जिवाणू संवर्धकांचाही वापर करावा. आवश्यकतेनुसार बुडख्यांची छाटणी, रोगनियंत्रण आणि नांग्या भरण्याची कामे करावीत.

पाचट जाळण्याऐवजी त्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास पाणी, खत आणि मजुरीची बचत होऊन खोडवा उसाचे उत्पादन वाढण्यास मदत होईल. अधिक माहितीसाठी कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे संपर्क साधावा, असे आवाहन देशमुख यांनी केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासा

द•ख•ल

एनपीटीईएल परीक्षेत इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोणीच्या ११ विद्यार्थ्यांचे यश

लोणी : लोकनेते लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोणी येथील ११ विद्यार्थ्यांनी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय स्तरावरील एनपीटीईएल (नॅशनल प्रोग्रॅम ऑन टेक्नॉलॉजी एन्हान्स्ड लर्निंग) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी 'फार्मास्युटिकल डोसेज फॉर्म्स' या विषयातील १२ आठवड्यांचा ऑनलाइन अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करून राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र प्राप्त केले. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये सोनाली पोपट शेळके, गायत्री संजय रक्ते, प्रियांका बबन गुंजाळ, साक्षी सुनील शिंदे, प्रतीक्षा श्रीनिवास चोळके, ऋतुजा संपत अरगडे, प्रतीक्षा ज्ञानदेव जगताप, सोनाली सुभाष शेळके, सुफैया समीर शेख, मृणाल राजेंद्र थोरात आणि सुषमा नामदेव मेंगाडे यांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती, औषधांची विविध स्वरूपे तसेच औषधनिर्माणशास्त्रातील आधुनिक संकल्पनांचे सखोल ज्ञान मिळाले. नियमित अभ्यास, जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे आणि अभ्यासातील सातत्याचे प्रतीक ठरले आहे.

स्नेहमेळाव्यानिमित्त रामदास गोल्हार यांनी घेतली माजी मंत्री शंकरराव गडाख यांची भेट



नेवासा : दिवाळी स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख रामदासजी गोल्हार यांनी माजी मंत्री शंकरराव गडाख यांची भेट घेऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी आम्ही आपल्या पाठीशी आहोत असा विश्वास व्यक्त करत त्यांनी आपुलकीचा आणि पाठिंब्याचा संदेश दिला. यावेळी नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सलग दोन जागांवर विजय मिळवल्याबद्दल जिल्हाप्रमुख रामदास गोल्हार यांनी माजी मंत्री शंकरराव गडाख यांचे अभिनंदन केले. यावेळी गोल्हार यांनी त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक कार्यास शुभेच्छा देऊन विविध विषयांवर चर्चा केली माजी शंकरराव गडाख व युवा नेते उदयनदादा गडाख यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आम्ही अहिल्यानगर जिल्ह्यात शिवसेना तळागाळात नेण्याचा प्रयत्न करत असून त्यास खेडोपाडी व गावागावात प्रतिसाद मिळत असल्याचे ही रामदासजी गोल्हार यांनी यावेळी बोलतांना स्पष्ट केले.

आनंदाचा शिधा वाटून खा. वाकचौरेंनी गोरगरिबांची दिवाळी फुलवली : शिंदे

शिर्डी : दिवाळीनिमित्त मतदारसंघातील हजारो गरजू कुटुंबांना आनंदाचा शिधा वाटप करून खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी गोरगरिबांची दिवाळी गोड केली, असे गौरवोद्गार शिर्डीचे सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब शिंदे यांनी काढले. खासदार वाकचौरे यांनी गावोगावी जाऊन नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखाची विचारपूस केली आणि आनंदाच्या शिध्याचे वाटप केले. त्यांच्या या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे.

लोकप्रतिनिधींनी सणाच्या काळात गरजूंच्या मदतीसाठी प्रत्यक्ष पुढाकार घेणे, हीच खरी जनसेवा असल्याचे शिंदे म्हणाले. या सामाजिक उपक्रमामुळे शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात अधिक बळकट होत असून, भविष्यातही वाकचौरे असेच लोकाभिमुख उपक्रम राबवतील, असा विश्वास नानासाहेब शिंदे यांनी व्यक्त केला.


साठवण तलाव काटेरी झाडांच्या विळख्यात ; स्वच्छतेकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

पुणतांबा : गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या जळगाव हद्दीतील साठवण तलावाला काटेरी झाडे आणि रानगवताचा विळखा पडला आहे. तलावाच्या चारही बाजूंनी वाढलेल्या वेड्या बाभळी व इतर झाडांमुळे पालापाचोळा पाण्यात पडण्याची शक्यता असून, पाण्याच्या स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. गावासाठी दोन साठवण तलाव असून, त्यापैकी जळगाव हद्दीतील तलावाची दोन वर्षांपूर्वी सुमारे तीन कोटी रुपये खर्चून दुरुस्ती करण्यात आली होती.

तलावाभोवती लोखंडी जाळीचे संरक्षण कुंपणही उभारण्यात आले आहे. मात्र, देखभालीअभावी परिसरात काटेरी झाडे व गवत वाढले आहे. तलावाच्या परिसरातील कडुनिंबाची झाडे वगळता इतर झाडे काढून वाळलेले गवत हटवावे आणि परिसर स्वच्छ ठेवावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. आगामी २० नोव्हेंबरला गोदावरी उजव्या कालव्याला आवर्तन सुटणार असून, तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यापूर्वी ग्रामपंचायतीने स्वच्छता व सुशोभीकरणाकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी

संजीवनीचा ५१ लाख ५१ हजारांचा मदतीचा हात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : सामाजिक बांधिलकी, सहकार आणि सेवाभावाची परंपरा जपणाऱ्या संजीवनी उद्योग समूहाने व कोल्हे परिवाराने पुन्हा एकदा सामाजिक उत्तरदायित्वाचे दर्शन घडवले आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी 'संजीवनी युनिव्हर्सिटी व संजीवनी ग्रुप' यांच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५१ लाख ५१ हजार रुपयांची देणगी देण्यात आली. या देणगीचा धनादेश मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

यावेळी आमदार विवेक कोल्हे, संजीवनी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे आणि विश्वस्त सुमित कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हा धनादेश प्रदान केला. यावेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी बांधवांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा कठीण प्रसंगी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून आपले कर्तव्य आहे, या भावनेतून संजीवनी परिवाराने हा मदतीचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि संकटाच्या काळात त्यांना आधार मिळावा, हा या मदतीमागील मुख्य उद्देश आहे. संजीवनी परिवाराच्या या स्तुत्य उपक्रमाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष कौतुक केले. सामाजिक जाणिवेतून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी कोल्हे कुटुंबीय व संजीवनीच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.

सहकारमहर्षी स्व.शंकरराव कोल्हे यांनी रुजविलेली सहकार, सामाजिक बांधिलकी आणि लोकसेवेची परंपरा पुढे नेत संजीवनी परिवाराने संकटग्रस्त घटकांच्या मदतीसाठी नेहमीच पुढाकार घेतला आहे. शिक्षण, सहकार, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाबरोबरच गरजूंच्या मदतीसाठीही संजीवनी परिवाराची ही वाटचाल समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी अधोरेखित करणारी ठरली आहे.

दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी आपली संवेदनशीलता दाखवत संजीवनी विद्यापीठाच्या माध्यमातून अध्यक्ष नितीन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे आणि विश्वस्त सुमित कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेसोबतच सामाजिक जाणिवेचा ठेवलेला आदर्श हा कौतुकास्पद आहे.माजी मंत्री स्व.शंकरराव कोल्हे यांनी ग्रामीण भागातील शेतकरी कष्टकरी यांच्यासाठी आपले जीवन व्यतीत केले त्यांच्या संस्कारांवर पुढील पिढ्यांचा आदर्शवत प्रवास संकटकाळी सामाजिक योगदान देण्यासाठी मोलाचा ठरतो आहे.

वडाळा बहिरोबा येथे भरदिवसा घरफोडी; ६५ हजारांचा ऐवज लंपास



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सोनई : नेवासा तालुक्यातील वडाळा बहिरोबा येथे अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करून ६५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. घराच्या दरवाजाचे आणि कपाटाचे कुलूप तोडून चोरट्यांनी ६० हजार रुपयांची रोकड आणि पाच हजार रुपये किमतीची चांदीची सहा नाणी चोरून नेली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत शनिशिंगणापूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविंद्र प्रकाश मोटे (वय ४१, रा. मुलांच्या वसतिगृहामागे, सांगवी रोड, वडाळा बहिरोबा) यांच्या घरी सोमवार (दि. १६) रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ६.१५ या वेळेत चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटाचे कुलूपही तोडून त्यातील ५००, २००, १०० आणि ५० रुपयांच्या नोटांमधील ६० हजार रुपयांची रोकड तसेच पाच हजार रुपये किमतीची चांदीची सहा नाणी असा एकूण ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

या प्रकरणी रविंद्र मोटे यांनी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १९६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) व ३३१(१) प्रमाणे १७ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार ज्ञानेश्वर माळवे तपास करीत आहेत. भरदिवसा घरफोडी झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, चोरट्यांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

बालदिनानिमित्त केव्हीके प्रवरा कम्युनिटी रेडिओवर चिमुरड्यांचे राज्य!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

लोणी : बालदिनाचे औचित्य साधत ९०.८ केव्हीके प्रवरा कम्युनिटी रेडिओच्या वतीने आयोजित अभिनव उपक्रमात चिमुरड्यांनीच रेडिओ केंद्राचा ताबा घेत संपूर्ण प्रसारणाची जबाबदारी लीलया पार पाडली. रेडिओच्या स्टुडिओपासून ते थेट प्रसारणापर्यंत विविध भूमिका आत्मविश्वासाने पार पाडत मुलांनी आपल्या कलागुणांची आणि नेतृत्वक्षमतेची अनोखी झलक दाखविली.



जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम पायरेन्सचे सचिव तथा संचालक डॉ. निलेश बनकर , प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या शिक्षण संचालिका लीलावती सरोदे, प्रवरा कन्या विद्यामंदिरच्या प्राचार्या विद्याताई घोरपडे यांच्या प्रयत्नात यांच्या सहकार्याने बालकांमध्ये प्रसारमाध्यमांविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांचा आत्मविश्वास वाढावा तसेच नेतृत्वगुणांना वाव मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या बालदिनाचे औचित्य साधून मुलांनी रेडिओ जॉकी, निवेदक, तंत्रज्ञ आणि संपादक अशा विविध जबाबदाऱ्या उत्साहाने सांभाळल्या.

या विशेष प्रसारणात लोणीच्या प्रवरा कन्या विद्या मंदीरच्या मुलांनी स्वतः गाण्यांच्या फर्माइशी सादर केल्या, बालगीते गायली, थोर व्यक्तींच्या बालपणीच्या आठवणी सांगितल्या तसेच बालदिनाचे महत्त्व श्रोत्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविले. थेट प्रसारणादरम्यान कोणताही संकोच न बाळगता मुलांनी केलेले सूत्रसंचालन विशेष लक्षवेधी ठरले. या अभिनव उपक्रमाचे पालक, शिक्षक तसेच परिसरातील नागरिकांनी कौतुक केले. मुलांना अशा प्रकारे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्यास त्यांच्यातील सुप्त कलागुण, आत्मविश्वास आणि नेतृत्वक्षमता विकसित होण्यास मोठी मदत होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या उपक्तमात पलक वदक (निमगाव जाळी), जान्हवी जोशी (लोणी), ओवी म्हस्के (बाभळेश्वर), प्रणव घोरपडे (पिंप्री निर्मळ), विराज घुले (गणेशनगर) आदीचा सहभाग होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेडीओच्या प्रमुख गायत्री म्हस्के, कैलास लोंढे आणि प्रवीण जमधडे यांनी विशेष प्रयत्न केले.

आरपीआयचे प्रदेश सचिव दीपकराव गायकवाड यांना 'समाजभूषण' पुरस्कार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : जेऊर कुंभारी येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे प्रदेश सचिव तथा आंबेडकरी चळवळीचे आधारस्तंभ दीपकराव गायकवाड यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेऊन 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कोपरगाव येथील साईबाबा तपोभूमी येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. दलित पँथरच्या काळापासून श्री. गायकवाड हे सातत्याने आंबेडकरी चळवळीमध्ये आणि सामाजिक क्षेत्रात सक्रीय कार्यरत आहेत. त्यांच्या या निष्ठावान व दीर्घकालीन समाजकार्याचा गौरव म्हणून त्यांना हा मान मिळाला आहे. धम्म परिषदेच्या निमित्ताने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू, द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आणि समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांच्या हस्ते दीपकराव गायकवाड यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.दीपकराव गायकवाड यांच्या सामाजिक कार्याची दखल यापूर्वीही अनेक नामवंत संस्थांनी घेतली आहे. कर्डक संस्था (नाशिक), मंत्रालय वार्ता (मुंबई) तसेच लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान यांसारख्या प्रतिष्ठित सामाजिक संस्थांकडून त्यांना यापूर्वीही 'समाजभूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

Change Of Name

I Have Change
My Old Name
Bilkis Bano Shaikh
(Before Name)
To New Name As
Bilkis Faruque Shaikh
(Aadhar Card No. 8036 5868 0233)
(After Name)
From Vide Affidavit Before
Notary Public Jamkhed
Place- Jamkhed
Date- 17/11/2026

Change Of Name

I Have Change My Old Name
Faruque Azam Abdul Shaikh
(Before Name)
To New Name As
Faruque Azam Abdul Karim Shaikh
(Aadhar Card No. 9451 2210 2685)
(After Name)
From Vide Affidavit Before
Notary Public Jamkhed
Place- Jamkhed
Date- 17/11/2026

राहुरी नगरपरिषद, राहुरी

फेर निविदा सूचना (तिसरी वेळ) - विद्युत विभाग

जा.क्र./का.वि./विद्युत/ ३२४ /२०२६-२७ दिनांक - १७/११/२०२६

राहुरी नगरपरिषद विद्युत विभागामार्फत खालील कामांसाठी सक्षम प्राधिकरणाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी संस्था/मक्तेदार/ठेकेदार यांचेकडून निविदा मागविणेत येत आहे.

अ.क्र	कामाचा तपशील	निविदा फॉर्म फी	बयाणा रक्कम	कामाची मुदत
१	राहुरी शहर पाणीपुरवठा योजना पंप हाउस येथील रोहीत्राचा भार वाढविणेसाठी Metering Kiosk चे CT व इतर अनुषंगिक कामे करणे	५००/-	१५००/-	३० दिवस

निविदा पध्दतीचा तपशील -

निविदा प्रसिध्दी व विक्री कालावधी	दि.१८/११/२०२६ ते दि.२५/११/२०२६ सायं ४.०० पर्यंत.
निविदा सादर करण्याचा शेवटचा दिनांक	दि. २५/११/२०२६ सायं ५.०० पर्यंत.
निविदा कार्यालयात जमा करणेचा शेवटचा दिनांक	दि.२५/११/२०२६ सायं ५.०० पर्यंत.
निविदा उघडणे (शक्य झाल्यास)	दि.२५/११/२०२६ सायं ५.०० नंतर.

निविदेचा कोरा फॉर्म नमूद कालावधीत कार्यालयीन वेळेत विद्युत विभागात उपलब्ध असेल.

(विद्या पाटील) मुख्याधिकारी
(हर्ष तनपुरे) उपाध्यक्ष
(भाऊसाहेब मोरे) नगराध्यक्ष

देवगड स्पोर्ट्स क्लबमध्ये महिला क्रिकेटचा जल्लोष

तीन दिवसीय एकदिवसीय मालिकेत देवगड क्विन्स विजयी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : महिला क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी अहमदनगर जिल्हा पंच व गुणलेखक संघटना आणि देवगड स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने १३, १४ व १५ नोव्हेंबर रोजी नेवासा तालुक्यातील देवगड येथील स्पोर्ट्स क्लबच्या हिरव्यागार टर्फ मैदानावर तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेचे यशस्वी आयोजन करण्यात होते. तीन दिवसीय एकदिवसीय मालिकेत देवगड क्विन्स विजयी ठरला.या स्पर्धेच्या निमित्ताने देवगड स्पोर्ट्स क्लबमध्ये महिला क्रिकेटचा जल्लोष पहावयास मिळाला. अहिल्यानगर जिल्ह्याच्या विविध भागांतून महिला क्रिकेटपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. जिल्ह्यातील महिला क्रिकेटपटूंना स्पर्धात्मक व्यासपीठ मिळावे, त्यांच्यातील कौशल्य विकसित व्हावे आणि महिला क्रिकेटला चालना मिळावी, हा या मालिकेचा मुख्य उद्देश होता.

या मालिकेचे उदघाटन सरपंच अजय पाटील साबळे यांच्या हस्ते व पालकांच्या उपस्थितीत करण्यात आले. देवगड स्पोर्ट्स क्लबचे हिरवेगार टर्फ मैदान राजेश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आले होते. संपूर्ण मालिकेचे नियोजन व व्यवस्थापन प्रियंका पालवे यांनी केले.या मालिकेत नेवासा टायग्रेस (कर्णधार अस्मिता पवार) आणि देवगड क्विन्स (कर्णधार आकांक्षा बोरुडे) या दोन संघांमध्ये तीन एकदिवसीय सामने रंगले. फलंदाजी आणि गोलंदाजीतील उत्कृष्ट



कामगिरीमुळे सर्व सामने चुरशीचे ठरले. पहिल्या सामन्यात पायल चव्हाण हिने ४ षटकांत २ निर्धाव षटकांसह अवघ्या ३ धावा देत २ बळी मिळवले. तिच्या या प्रभावी गोलंदाजीसाठी तिला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. अन्वी देवकर हिने ६२ चेंडूंत ४७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, तर राजवीर कांडे हिने ४ षटकांत ६ धावा देत १ बळी मिळवला.

दुसऱ्या सामन्यात मेहरनाज यादव हिने ८ षटकांत २९ धावा देत ५ बळी मिळवून सामन्यावर आपली छाप पाडली. या कामगिरीसाठी तिला सामनावीर घोषित करण्यात आले. भूमी घोगरे हिने ९५ चेंडूंत ५९ धावांची संयमी खेळी केली, तर अक्षरा दांगे हिने ९ षटकांत २२ धावा देत ३ बळी मिळवले. तिसऱ्या सामन्यात आकांक्षा बोरुडे हिने २७ चेंडूंत नाबाद ३५ धावा आणि ४ षटकांत २३ धावा देत १ बळी अशी अष्टपैलू कामगिरी केली. तिला सामनावीर पुरस्कार मिळाला. श्रीया टिकोन हिने ९१ चेंडूंत ८७ धावांची शानदार खेळी केली, तर अस्मिता पवार हिने ५ षटकांत एका निर्धाव षटकासह १८ धावा देत २ बळी मिळवले.

मालिकेतील वैयक्तिक पुरस्कारांमध्ये अन्वी देवकर (१३८ धावा) हिला सर्वोत्कृष्ट फलंदाज, मेहरनाज यादव (८ बळी) हिला सर्वोत्कृष्ट गोलंदाज, तर २ झेल आणि २ धावबाद अशा क्षेत्ररक्षणातील कामगिरीसाठी मेहरनाज यादव हिलाच सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. सातत्यपूर्ण फलंदाजीसाठी श्रीया टिकोन हिला मालिकावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला. मालिकेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज आणि शिरसाठ स्पोर्ट्सचे संस्थापक अमोल शिरसाठ यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांसह उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या मालिकेत देवगड क्विन्स संघाने विजेतेपद तर नेवासा टायग्रेस संघाने उपविजेतेपद पटकावले. महिला क्रिकेटच्या विकासासाठी आयोजित करण्यात आलेली ही मालिका खेळाडू, पालक आणि क्रिकेटप्रेमींसाठी उत्साहवर्धक ठरली. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील महिला क्रिकेटपटूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळून जिल्ह्यात महिला क्रिकेटची चळवळ अधिक बळकट होण्यास निश्चितच मदत होईल.

पहाटेच्या गुलाबी थंडीत टाळ मृदुंगाच्या आवाजाने गावकरी होतात जागे

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : सध्याभल्या पहाटे गुलाबी थंडीत काकडा भजन आणि टाळ मृदुंग आणि चिपळ्यांचा आवाज यामुळे राहुरी शहरासह ग्रामीण भागात विविध गावांमध्ये दिवसा पहाटे चार ते साडेचार वाजता सुरू होत असल्याने या नामस्मरणाने विशेष करून महिला भगिनी व तरुणवर्ग आणि गावातील नवीन पिढीला एक नवीन ऊर्जा मिळत असल्याचा अनुभव गावातील भाविक भक्त व्यक्त करतांना दिसुन येत आहे. राहुरी शहरात असलेल्या राहुरी शहर हे तुळजाभवानीचे माहेर समजल्या जाणाऱ्या तुळजाभवानी मंदिरात दीपावलीच्या १५ दिवस अगोदर सुरू झालेल्या या काकडा आरतीस गावातील मोठ्या प्रमाणात महिलावर्ग व भजनी मंडळ एकत्र येऊन दरवर्षी महिना भर मंदिरामध्ये काकड आरतीचे आयोजन करीत असतात. यामुळे गावातील आध्यात्मिक व धार्मिक वातावरण ढवळून निघते तर गावातील धार्मिकतेचा संवाद भाविकांमध्ये निर्माण होत आहे. या काकड आरतीला कार्तिक स्नान म्हणूनही काही ठिकाणी संबोधले जाते.

या काकड आरतीच्या वेळी श्री कृष्णाच्या मूर्तीची मनमोहक अशी सजावट महिला मंडळ करीत असतात व दररोज श्रीकृष्णाला पंचपक्वानाचा नैवेद्य दाखवून भोग दिल्या जातो. यावेळी पहाटे एकाच सुरत महिला मंडळाचे भजन ऐकून मन तृप्त होऊन जाते. व दिवसभर प्रसन्नता लाभते अशी भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे दिवसेंदिवस या काकड आरती साठी महिला भगिनींची गर्दी वाढत चालली आहे.



मराठी अश्विन महिन्याच्या पौर्णिमेला सुरू झालेली काकड आरतीची कार्तिक पौर्णिमेला सांगता होते. ही काकड आरती पहाटे ४ वाजता सुरू होऊन सकाळी सूर्योदयाला त्यांची रोज सांगता होत असल्याने याकाळात गुलाबी थंडीत काकडा करणारी महिला मंडळ सकाळी स्नान करून मंदिरात पहाटे चार वाजता नित्यनेमाने येतात. त्यामुळे गावातील भजनी मंडळाचा सकाळीच दिवस लवकर सुरू झाल्याने घराची स्वच्छता, आणि सकाळीच आनंददायी व धार्मिकतेचे वातावरण झाल्याने दिवसभरातील कामात मन प्रसन्न राहते असा अनुभव भजनी मंडळी व्यक्त करताना दिसत आहेत. राहुरीचे ग्रामदैवत श्री . खंडेराय मंदिर, श्री हनुमान मंदिर, विशेष म्हणजे तुळजाभवानीचे राहुरी शहरातील मंदिरात पहाटेच्या गुलाबी थंडी त सुरू असलेल्या या काकड आरतीची कार्तिकी पौर्णिमेला सांगता होणार असल्याची माहिती महिलाभजनी मंडळाने दिली. भल्या पहाटेच्या या काकडा आरतीने शहरातील भाविक भक्तांमध्ये महिनाभर वेगळेच चैतन्य लाभत असल्याने यामध्ये वर्षानुवर्ष सुरू असलेली परांपरा आता तरुणाईने स्वीकारली असल्याचे चित्र दिसून येत आहे.



तेलकुडगाव मध्ये पाथर्डी–नाशिक बसचे स्वागत

पाथर्डीहुन तेलकुडगाव मार्गे नाशिक बस सेवा सुरू झाली. ही बस अमरापूर, आव्हाणे, ढोरजळगाव, तेलकडूगाव, चिलेखनवाडी, कुकाणा मार्गे नाशिककडे मार्गस्थ होईल. तेलकुडगाव ग्रामस्थांनी या बसचे स्वागत केले.

(छायाचित्र : संजय काळे)

वैजापूर येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना विनम्र अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : शिवसेनाप्रमुख, हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथी निमित्त वैजापूर येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून बाळासाहेबांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसाच्या हक्कासाठी, हिंदुत्वाच्या रक्षणासाठी आणि महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी आयुष्यभर लढा दिला. सामान्य शिवसैनिकाला ताकद देण्याचे काम बाळासाहेबांनी केले. त्यांचे विचार, त्यांची वाणी आणि त्यांचा बाणा आजही प्रत्येक शिवसैनिकाला प्रेरणा देतो. मराठी माणूस मुंबईत, महाराष्ट्रात स्वाभिमानाने उभा राहिला तो केवळ बाळासाहेबांमुळे. त्यांचे विचार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे हेच खरे अभिवादन ठरेल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील निकम मनोज गायके मनाजी पाटील मिसाळ ऍड रमेश पाटील सावंत शिवसेना पदाधिकारी, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते व वैजापूर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिवसैनिकांनी परिश्रम घेतले.



रोहित पठारे हत्येने कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली

स्थानिक पोलिसांचा तपास संशयास्पद : हर्षवर्धन सपकाळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संभाजीनगर / वैजापूर - छत्रपती संभाजीनगर मधील वैजापूर येथील मागास वर्गीय तरुण रोहित पठारे याची हत्या अत्यंत गंभीर घटना आहे. भाजपाच्या राजवटीत मागासवर्गीय समाज सुरक्षित नाही असे या घटनेवरून दिसत आहे. पोलिसांचे गुन्हेगारांना भय राहिलेले नाही, गृह विभागावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वचक नाही. म्हणून अशा हत्या सातत्याने होत आहेत. रोहित पठारे हत्येचा तपास समाधानकारक नाही, त्यामुळे सध्याची एसआयटी रद्द करून आयपीएस अधिकाऱ्याच्या एसआयटी मार्फत तपास करा, त्यामध्ये वैजापूर बाहेरचे अधिकारी व महिला अधिकारी नियुक्त करा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

सपकाळ यांनी आज रोहित पठारेच्या कुटुंबियांची भेट घेतली, यावेळी सोबत खासदार कल्याण काळे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण डोणगावकर, राजाभाऊ देशमुख



यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. या दरम्यान माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, राज्यातील खराब कायदा व सुव्यवस्थेला गृहमंत्री देवेंद्र फडणवीसच जबाबदार आहेत. रोहित पठारेची हत्या अत्यंत क्रूर पद्धतीने करण्यात आली आहे. पठारेची हत्या बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येसारखीच विकृत पद्धतीने केली आहे. मराठवाड्यात व राज्यात अशा पद्धतीने होणाऱ्या हत्या कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगण्याचा प्रकार आहे. गुंडांची हिम्मत कशी होते, अशा विकृत पद्धतीने वागण्याची. राज्यात पोलिस यंत्रणा राहिलेली नाही, गुंडांना पोलिसांचे भय राहिलेले नाही. 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रिदवाक्याप्रमाणे पोलिसांचे वर्तन नसून महाराष्ट्र पोलीस खल प्रवृत्तीचे रक्षण करत आहेत, असेच या घटना पाहता दिसत आहे.

आठवडे बाजारानंतर खोकरमध्ये अस्वच्छतेचे साम्राज्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

भोकर : श्रीरामपूर तालुक्यातील खोकर येथे दर रविवारी भरणाऱ्या आठवडे बाजारानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा आणि अस्वच्छता निर्माण होत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. बाजार संपल्यानंतर सोमवारी सकाळी मुख्य रस्ता आणि बाजार परिसरात प्लास्टिक पिशव्या, कागद, सडलेला भाजीपाला व इतर कचरा अस्ताव्यस्त पडलेला दिसतो. ग्रामपंचायत प्रशासनाकडून नियमित स्वच्छता होत नसल्याने दुर्गंधी, डास आणि रोगराई पसरण्याची भीती व्यक्त होत आहे. खोकर येथे गेल्या दोन ते तीन वर्षांपासून आठवडे बाजार भरत आहे. त्यामुळे ग्रामस्थांची बाहेरगावी बाजारासाठी होणारी धावपळ आणि खर्च वाचत असून स्थानिक शेतकरी व परिसरातील भाजीपाला विक्रेत्यांनाही विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. बाजार नव्याने सुरू झाल्याने व्यावसायिकांवर आर्थिक बोजा पडू नये म्हणून तत्कालीन सरपंच व सदस्य मंडळाने स्वच्छता कराची वसुली न करता ग्रामपंचायतीच्या खर्चातून नियमित साफसफाईची व्यवस्था केली होती.मात्र, गेल्या दहा महिन्यांपासून ग्रामपंचायतीचा प्रशासकीय कारभार सुरू असून स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रविवारी रात्री बाजार संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत कचरा तसाच पडून राहतो. गावातील मुख्य रस्त्यावरून दररोज शालेय विद्यार्थी आणि शेकडो नागरिकांची ये-जा सुरू असते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे स्वच्छ भारत अभियान राबविले जात असताना खोकरमध्ये मात्र दर आठवड्याला अस्वच्छतेची समस्या निर्माण होत आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने बाजार संपल्यानंतर तातडीने स्वच्छता करण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

वीर वडार एकता फाउंडेशनच्या बैठकीत एकजुटीचा एल्गार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिंगणापूर : वडार समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी आणि सर्वांगीण विकासासाठी संघटनात्मक ताकद उभी करण्याचा निर्धार वीर वडार एकता फाउंडेशनच्या मुंबई येथे झालेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय पदाधिकारी व कार्यकर्ता बैठकीत व्यक्त करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष विजय गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीला राज्यभरातून हजारो पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव उपस्थित होते. यावेळी संदिप अशोकराव कुसळकर यांची महाराष्ट्र राज्य कोअर कमिटी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. बैठकीत वडार समाजाचे प्रलंबित सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. तरुणांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचवणे आणि समाजाच्या मागण्यांसाठी शासनदरबारी संघटितपणे पाठपुरावा करण्यावर भर देण्यात आला. समाजहितासाठी सातत्याने केलेले कार्य आणि संघटनात्मक योगदानाची दखल घेऊन संदिप कुसळकर यांच्यावर राज्यस्तरीय जबाबदारी सोपविण्यात आली. तसेच गणपत पिट्टेवाड यांची महाराष्ट्र कार्याध्यक्षपदी, ललिता धनवटे यांची महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षपदी, श्रद्धा गुंजाळ यांची ठाणे महिला जिल्हाध्यक्षपदी, तर संगीता जेठे यांची रायगड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. मार्गदर्शन करताना विजय गोरे यांनी समाजातील विखुरलेपणा दूर करून गावापासून राज्यस्तरापर्यंत संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले. केवळ बैठका न घेता समाजाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने संघर्ष करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बैठकीच्या आयोजनासाठी महासचिव ब्रह्मा धोत्रे, सहसचिव रमेश धोत्रे, कोषाध्यक्ष नागेश चौगुले, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष संपत गायकवाड यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कुसळकर यांच्या नियुक्तीमुळे सोनईसह अहिल्यानगर जिल्ह्यातील वडार समाजात आनंदाचे वातावरण आहे.



रेणुकादेवी आश्रमाची दुसरी मोहटादेवी गड पदयात्रा उत्साहात

चार दिवसांत ११० किलोमीटरचा पायी प्रवास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वडाळा महादेव : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्री क्षेत्र रेणुकादेवी आश्रमाच्या वतीने संस्थापक मौनयोगी सद्गुरू रेवणनाथ महाराज यांच्या प्रेरणेने आयोजित दुसरी मोहटादेवी गड पदयात्रा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाली. सलग दुसऱ्या वर्षी आयोजित या पदयात्रेत भाविकांनी चार दिवसांत तब्बल ११० किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण करून मोहटादेवी गडावर आई भगवतीचे दर्शन घेतले.

भाऊबीजेच्या दुसऱ्या दिवशी श्री क्षेत्र रेणुकादेवी आश्रमातून पदयात्रेचा प्रारंभ झाला. मातापूर, मालुंजा, मांजरी, पानेगाव, बेल्हेकरवाडी, सोनई येथील काच मंदिर, शनिशिंगणापूर, घोडेगाव, मिरी, तिसगाव, मढी, धामणगाव देवी आणि पाथर्डीमार्गे चौथ्या दिवशी पदयात्रा मोहटादेवी गडावर पोहोचली. संपूर्ण प्रवासात रेणुकामाता आणि मोहटादेवीचा जयघोष करीत भाविकांनी भक्ती व सेवाभावाचा अनुभव घेतला.

मोहटादेवी गडावर पदयात्रेचे आगमन होताच देवस्थान समितीच्या वतीने संबळ, टाळ-मृदंगाच्या गजरात स्वागत करण्यात आले. भगवती माता आणि सद्गुरूंच्या चरणपादुकांचे विधिवत पूजन करण्यात आले. देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी स्वागत व सत्काराचे संयोजन केले. जनसंपर्क अधिकारी खाडे आणि सुरक्षा अधिकारी ठोंबरे यांनी पदयात्रींचा सन्मान केला.

यावेळी रेणुकादेवी आश्रमाचे विश्वस्त प्रा. ॲड. आदिनाथ जोशी, दत्तात्रेय भांड, पत्रकार राजेंद्र देसाई, सूरज सूर्यवंशी, बापूसाहेब पिटेकर यांच्यासह पदयात्री उपस्थित होते. मार्गातील विविध गावांमध्ये ग्रामस्थांनी सडा-रांगोळ्या, फुलांच्या पायघड्या आणि औक्षण करून पदयात्रेचे स्वागत केले. चार दिवसांचा ११० किलोमीटरचा प्रवास पूर्ण करून पदयात्रा रेणुकादेवी आश्रमात परतल्यानंतर फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत करण्यात आले. आईसाहेब नलिनी जोशी आणि सौ. आदिती जोशी यांनी पदयात्रींचे औक्षण केले. भक्ती, श्रद्धा आणि एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या पदयात्रेची उत्साहात सांगता झाली.

दाढ बुद्रुक सोसायटीच्या चेअरमनपदी गाडेकर, तर व्हा.चेअरमनपदी बनसोडे बिनविरोध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूलमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या दाढ बुद्रुक विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवड नुकतीच बिनविरोध पार पडली. विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुनील भारतदादा तांबे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या निवड प्रक्रियेत चेअरमनपदी बाबुराव कारभारी गाडेकर, तर व्हाईस चेअरमनपदी



भगवान प्रल्हाद बनसोडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.चेअरमन पदासाठी मारुती हरिभाऊ तांबे यांनी सूचक म्हणून प्रस्ताव मांडला त्यास भाऊसाहेब भागवत पाळंदे यांनी अनुमोदन दिले. व्हाईस चेअरमन पदासाठी सीताराम जाखुजी तांबे यांनी सूचक म्हणून प्रस्ताव मांडला त्यास भगवान विश्वनाथ झनान यांनी अनुमोदन दिले.दोन्ही पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीप्रसंगी उपसरपंच नकुल तांबे , ट्रक वाहतूक सोसायटीचे संचालक भारत वाकचौरे, प्रल्हाद तांबे, गंगा तांबे, राजेंद्र तांबे, संजय झनान, पांडू कुमकर, मुकेश काळे, भास्कर तांबे, प्रवरा बँकेचे संचालक संजय गाडेकर, लक्ष्मण तांबे, इंदुबाई वाणी, सुदाम गाडेकर, सोमनाथ गाडेकर, मंगल गाडेकर, सुभाष तांबे, विठ्ठल तांबे यांच्यासह प्रमुख ग्रामस्थ उपस्थित होते. दाढ बुद्रुक सोसायटी ही जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था असून संस्थेने सहकार क्षेत्रात आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटविला आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून संस्थेच्या प्रगतीला अधिक गती मिळेल, तसेच सभासद, शेतकरी व ठेवीदारांच्या हिताचे निर्णय घेत संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू राहील, असा विश्वास कारखान्याचे संचालक सुनील तांबे यांनी यावेळी व्यक्त केला.निवड प्रक्रियेचे कामकाज सहाय्यक निबंधक तथा अध्यासी अधिकारी नामदेव ठोंबळ यांनी पाहिले. त्यांना संदीप कोठुळे यांनी सहकार्य केले. व्यवस्थापक संतोष तांबे यांनी आभारप्रदर्शन केले.

बाळासाहेबांचे ज्वलंत विचार शिवसैनिकांना स्फूर्ती व प्रेरणा देत राहतील : रामदास गोल्हार

सुधीर चव्हाण । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त मुंबई येथील त्यांच्या स्मृतिस्थळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे अहिल्यानगर जिल्हाप्रमुख रामदास गोल्हार यांनी पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन केले.

याप्रसंगी बोलताना रामदास गोल्हार म्हणाले की, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे ज्वलंत हिंदुत्ववादी विचार हेच शिवसेनेचे खरे वैचारिक बळ आहे. त्यांचे धगधगते विचार आणि प्रखर नेतृत्वाची प्रेरणा प्रत्येक शिवसैनिकाला सदैव स्फूर्ती देत राहील. बाळासाहेबांचे विचार हे केवळ आठवणींपुरते मर्यादित नसून ते शिवसैनिकांसाठी संघर्षाची ऊर्जा आणि कार्याची दिशा देणारे आहेत.

आज बाळासाहेबांचे सच्चे शिवसैनिक पुन्हा एकत्रित येऊन नव्या जोमाने कामाला लागले आहेत. त्यामुळे शिवसेना पुन्हा एकदा नव्या ताकदीने उभी राहील, असा ठाम विश्वासही रामदास गोल्हार यांनी यावेळी व्यक्त केला.


निधनवार्ता

लक्ष्मणराव सरोदे



टाकळीभान श्रीरामपूर तालुक्यातील उंदीर गाव येथील माजी सरपंच व सोसायटीचे माजी चेअरमन लक्ष्मणराव बाबुराव सरोदे यांचे वृद्धापकाळाने दुःख निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले सुना नातवंडे बहिणी पुतणे असा मोठा परिवार आहे ते पांडुरंग सरोदे, दत्तात्रय सरोदे व राजेंद्र सरोदे यांचे ते वडील होत.

वत्सलाबाई गडकरी



शिर्डी : राहाता तालुक्यातील सावळीविहीर बुद्रुक येथील ज्येष्ठ पत्रकार राजकुमार गडकरी यांच्या मातोश्री वत्सलाबाई विठ्ठल गडकरी (वय ८०) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

चंदाबाई पांडे



श्रीरामपूर : शहरातील मोरगे वस्ती परिसरात वास्तव्यास असलेल्या चंदाबाई देवीलालजी पांडे (वय -७५) यांचे शनिवार, दि. १४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, दिर, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या महावीर नाष्टा सेंटरचे मालक राजेंद्र पांडे व गणेश पांडे यांच्या मातोश्री, विकास पांडे यांच्या आजी होत्या.

पान १ वरुन

बंधाऱ्यांत पाण्यासाठी शेतकऱ्यांचे 'शोले स्टाईल' आंदोलन!

शेतकऱ्यांनी टायांवर चढून आंदोलन सुरू केले. महांकळवाडगाव येथे शेतकरी संघटना जिंदाबाद, 'कोण म्हणतं मिळणार नाही, घेतल्याशिवाय राहणार नाही' अशा घोषणा देत शेतकऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. यंदा पाण्याअभावी रब्बी हंगाम धोयात आला असून हातातोंडाशी आलेली खरीप पिके वाचविण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे. त्यातच कापूस वेचणी, ऊसतोडीची प्रतीक्षा आणि जनावरांसाठी पुढील सहा महिन्यांचा चारा म्हणून मका कुट्टी करण्याची कामे सुरू आहेत. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना दिवसभर आंदोलनस्थळी थांबणे शय होत नसल्याने सकाळी आणि सायंकाळी आलटून-पालटून शेतकरी आंदोलनात सहभागी होत आहेत. दररोज सायंकाळी आंदोलनस्थळी कीर्तन व भजनाचे कार्यक्रमही होत आहेत.

शिर्डी विमानतळ परिसरात होणार भव्य पंचतारांकित हॉटेल

व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर उपस्थित होते. त्यांच्यासोबतच दी इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेड (ताज समूह) चे अधिकारी व प्रतिनिधी सुद्धा या महत्त्वपूर्ण सोहळ्यात सहभागी झाले होते. या प्रकल्पाच्या प्रत्यक्षात येण्याने शिर्डीच्या विकासात आणखी एक सुवर्णपान जोडले जाणार आहे.

गुहा शाळेचे मुख्याध्यापक अन्सार पठाण निलंबित !

पुन्हा चिकटविणे अशा बाबी निदर्शनास आल्या. संबंधित विद्यार्थी प्रत्यक्षात मूळ शाळेतच परीक्षा देत असल्याचे पुरावेही तपासात मिळाल्याचे सांगण्यात आले. या कारवाईमुळे राहुरी तालुयातील जिल्हा परिषद शाळांमधील कथित बोगस पटसंख्या प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून, या प्रकरणातील अन्य संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकांवर प्रशासनाकडून कोणती कारवाई होते, याकडे आता शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

बुधवार दि. १८ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१	१४६ १२८ १००	०	१९० १२७ ५५०	१	१२८ २९० १५५

१२-७०-८४-०९-३५

कल्याण
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

२	१२९ ४८० ६६०	७	१२४ १७९ ११५	२	१२९ ३४६ २५५

२६-९७-४१-०३-७५

मुंबैम (मेन)
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

०	१४५ २८० ४८०	६	१२३ ४४८ ८८०	५	१४० २३० २२१

०२-४६-५३-१८-६९

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
२७८	१४७
७८	२९
५५८	३८८

dpbosssss.live
Mydpboss.com

विद्यार्थी : समाजाच्या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार : डॉ. राजेंद्र बगाटे

विद्यार्थी हा कोणत्याही राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक विकासाचा महत्त्वाचा आधार असतो. आजच्या विद्यार्थ्यांच्या विचारांवर, शिक्षणावर आणि कृतीवर उद्याच्या समाजाचे स्वरूप अवलंबून असते. विद्यार्थी जीवन हा केवळ पुस्तकी ज्ञान आणि परीक्षा यापुरता मर्यादित नसून व्यक्तिमत्त्व विकास, वैचारिक जडणघडण आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा महत्त्वाचा टप्पा आहे. विद्यार्थ्यांच्या अधिकारांचा, शिक्षणातील समान संधींचा आणि लोकशाही मूल्यांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी १७ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो.

या दिवसामागे विद्यार्थ्यांच्या संघर्षाचा प्रेरणादायी इतिहास आहे. १९३९ मध्ये नाझी जर्मनीच्या दडपशाहीविरुद्ध चेकोस्लोव्हाकियातील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. या आंदोलनात वैद्यकीय विद्यार्थी जान ओप्लेटल गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अंत्ययात्रेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवर नाझी सत्तेने कारवाई केली. १७ नोव्हेंबर १९३९ रोजी अनेक विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली, नऊ विद्यार्थी नेत्यांना मृत्युदंड देण्यात आला आणि विद्यापीठे बंद करण्यात आली. या बलिदानाच्या स्मरणार्थ हा दिवस आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून ओळखला जाऊ लागला.

शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत मानवी अधिकार आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. मात्र, शिक्षणाचा अधिकार केवळ शाळेत प्रवेश मिळण्यापुरता मर्यादित नसून गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रशिक्षित शिक्षक, सुरक्षित वातावरण आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा मिळणेही महत्त्वाचे आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखविला. त्यांचे विचार आजच्या विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहेत. आज विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण, बेरोजगारी, आर्थिक अडचणी, ग्रामीण-शहरी शैक्षणिक सुविधांमधील असमानता आणि स्पर्धेचा ताण अशी अनेक आव्हाने आहेत. विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मुलींच्या शिक्षणातही काही ठिकाणी सामाजिक रूढी आणि आर्थिक मर्यादा अडथळा ठरतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण पूर्ण करण्यासाठी समान संधी आणि आवश्यक आर्थिक पाठबळ मिळणे गरजेचे आहे.

आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे ज्ञानप्राप्तीच्या संधी वाढल्या आहेत. मात्र, तंत्रज्ञानाचा वापर करताना विद्यार्थ्यांनी स्वतःची विचारशक्ती, सर्जनशीलता आणि चिकित्सक दृष्टिकोन जपला पाहिजे. चुकीची माहिती, सायबर छळ आणि सामाजिक माध्यमांच्या अतिवापरापासून सावध राहणेही आवश्यक आहे. त्याचबरोबर शैक्षणिक यशाच्या स्पर्धेत मानसिक आणि भावनिक आरोग्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. परीक्षेतील गुणांपेक्षा विद्यार्थ्यांचे कौशल्य, आवड, क्षमता आणि व्यक्तिमत्त्व विकास यांना महत्त्व दिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच सामाजिक प्रश्नांचे भान ठेवणे आवश्यक आहे. गरिबी, निरक्षरता, पर्यावरणाचा ऱ्हास, व्यसनाधीनता आणि सामाजिक विषमता यांविषयी जागरूक राहून समाजहिताच्या उपक्रमांत सहभागी झाले पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, वृक्षारोपण, स्वच्छता, जलसंवर्धन आणि ग्रामविकासाच्या उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी विकसित होऊ शकते. लोकशाही मूल्यांचा आदर, वैज्ञानिक दृष्टिकोन, समानता, बंधुता आणि सामाजिक सलोखा जपणे हीदेखील विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे.

बदलत्या काळात केवळ पदवी मिळविणे पुरेसे नसून संवादकौशल्य, नेतृत्वक्षमता, तांत्रिक ज्ञान, संशोधनवृत्ती आणि रोजगारनिर्मितीची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. शिक्षक, पालक, शैक्षणिक संस्था आणि शासन यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. विद्यार्थी हा केवळ उद्याचा नागरिक नसून आजच्या समाजपरिवर्तनाचा सक्रिय घटक आहे. त्याच्या विचारांत नवेपणा, कृतीत ऊर्जा आणि स्वप्नांत परिवर्तनाची ताकद असते. विद्यार्थ्यांच्या क्षमतांना योग्य व्यासपीठ देणे आणि त्यांच्या प्रश्नांना समजून घेणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण सक्षम विद्यार्थी घडविणे म्हणजे सक्षम, समताधिष्ठित आणि प्रगत राष्ट्राची पायाभरणी करणे होय. हाच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनाचा खरा संदेश आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक)
ईमेल : bagate.ajend@gmail.com

‘ताजनापूर’च्या पाण्यासाठी २७ नोव्हेंबरला नगरला ‘आक्रोश मोर्चा’

कुठल्याही पातळीवर संघर्ष करण्याची तयारी : ॲड. काकडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : ताजनापूर लिफ्ट सिंचन योजनेच्या शिल्लक पाण्यासाठी आणि शेवगाव तालुक्यातील पूर्व भागाच्या सिंचन प्रश्नासाठी आता आरपारच्या लढाईची वेळ आली आहे. कुठल्याही पातळीवर संघर्ष करण्याची तयारी दर्शवत, ताजनापूर लिफ्ट कृती समितीच्या वतीने येत्या २७ नोव्हेंबर (शुक्रवार) रोजी अहिल्यानगर येथे भव्य ’आक्रोश मोर्चा’ काढण्याचा आक्रमक पवित्रा घेण्यात आला आहे. बोधेगाव येथे पार पडलेल्या सर्वपक्षीय बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

ताजनापूर लिफ्ट योजनेचे शिल्लक पाणी शेवगाव तालुक्याच्या पूर्वकडील दुष्काळी असलेल्या २५ गावांना मिळावे, या प्रमुख मागणीसाठी बोधेगाव (ता. शेवगाव) येथील बन्नोमाँ दर्गा सभागृहात ड. शिवाजीराव काकडे यांच्या पुढाकाराने सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यात आली. योजनेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक गावात ग्रामसभेचे ठराव घेऊन अहिल्यानगर येथील पालकमंत्री कार्यालय आणि जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना ’आक्रोश मोर्चा’ने जाऊन ठरावासह मागण्यांचे निवेदन दिले जाईल. गरज भासल्यास मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेण्याची तयारी दर्शवण्यात



आली असून हा लढा स्वखर्चाने लढून पाण्यासाठी कोठेही जाण्यास उपस्थितांनी हात उंचावून संमती दिली.

या बैठकीतील पुढीलप्रमाणे प्रमुख मागण्या करण्यात आल्या. १.ताजनापूर टप्पा क्रमांक ३ अंतर्गत येणाऱ्या गावांचे पुढील ३ महिन्यांत सर्वेक्षण करावे., २. गावोगावचे बंधारे खोलीकरण करून ते वर्षातून चार वेळा जायकवाडी धरणातील पाण्याने १००% भरून द्यावेत., ३. शेवगाव तालुक्यासाठी आरक्षित असलेले ३.८ टीएमसी पाणी फक्त शेवगावलाच मिळावे; पाथर्डीसाठी यातून पाणी न देता स्वतंत्र योजना करावी.,४. प्रस्तावित ताजनापूर टप्पा क्र. ३ मधून वगळण्यात आलेल्या अंतरवाली बुद्रुक, अंतरवाली खुर्द, लखमापुरी, सोनविहिर आणि गायकवाड जळगाव या ५ गावांचा योजनेत समावेश करावा. आपल्या सर्वांच्या भविष्यासाठी महिला व युवकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सक्रिय सहभाग दाखवावा असे आवाहन सौ.हर्षदा काकडे यांनी केले.

विशेष म्हणजे, दिवंगत आबासाहेब काकडे यांच्यासोबत पाणी प्रश्नावर तुरुंगवास भोगलेले जुन्या काळातील दत्तात्रय शिंदे, मोहन घोरतळे, विठ्ठल चेडे, दिलीप दसपुते आणि इस्माईल पटेल हे ज्येष्ठ या बैठकीत आवर्जून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने आंदोलनाला जुन्या संघर्षाची किनार लाभल्याचे दिसून आले.

या बैठकीस शिवसेना नेत्या सौ.हर्षदा काकडे, माजी जि.प सदस्य प्रकाश भोसले, माजी सरपंच राम अंधारे, सेवा सो.चे माजी अध्यक्ष विठ्ठलराव तांबे, बालमटाकळीचे उपसरपंच सर्जेराव घोरपडे, नवनाथ खेडकर, राम गरगडे, नवनाथ फुंदे, सुनील गायके, माणिक गर्जे, माऊली चेमटे, पृथ्वीसिंह काकडे, प्रमोद तांबे, बन्सी मिसाळ, बाबासाहेब चेडे, गहिनीनाथ बोडखे, दादा साखरे, बाप्पासाहेब बर्डे, विक्रम बारवकर, बाळासाहेब गुठे, बबन घोंगडे, भागवत भोसले, रामकिसन झिरपे, संदीप काकडे, भाऊसाहेब पोटभरे, भास्कर मासाळ, लक्ष्मण गवळी, करण वंजारी, परशुराम गरड, राजू वडते, शिवाजी वडते, सटवाजी बरे, संदीप फुंदे यांच्यासह शेकडो ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते.

नेप्तीत ६९ लाखांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पारनेर : नगर विधानसभा मतदारसंघात नगर तालुक्यातील ४३ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण स्वतः लक्ष घालून शासनाच्या माध्यमातून आतापर्यंत २० ते २२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून विविध विकासकामे मार्गी लावली आहेत. नगर तालुक्याच्या विकासाला आपण सातत्याने प्राधान्य दिले असून, विकासकामांच्या बाबतीत कार्यकर्त्यांनी निश्चिंत राहावे. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून, यापुढेही गावागावांतील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही आमदार काशिनाथ दाते सर यांनी नेप्ती येथिल ६९ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण प्रसंगी दिली.

नेप्ती गावातील रस्ते व पायाभूत



सुविधांना बळकटी देणाऱ्या सहा विकासकामांचा यामध्ये समावेश आहे. यामध्ये कल्याण बायपास ते बाबासाहेब होळकर घर रस्ता (१० लाख), पोपट जपकर घर ते बाबासाहेब होळकर घर रस्ता (१० लाख), नेप्ती बायपास रस्ता सुधारणा (१८ लाख), स्मशानभूमी ते सय्यद वस्ती रस्ता सुधारणा (१८ लाख), राम मा-६१ ते रावळे वस्ती रस्ता (५ लाख) आणि कृष्णवाडी रस्ता (८ लाख) या कामांचा समावेश आहे.

यावेळी बोलताना आ. दाते यांनी नगर तालुक्यातील विकासकामांचा आढावा घेतला. सोनेवाडी येथे नुकत्याच झालेल्या रस्त्याच्या कामाच्या उद्घाटनाचा तसेच विधानसभा निवडणुकीनंतर हिंगणगाव येथे एक कोटी रुपयांच्या निधीतून मार्गी लावलेल्या विकासकामांचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. नगर तालुक्यातील कार्यकर्ते विकासकामांच्या बाबतीत समाधानी असून, लोकांच्या अपेक्षेनुसार विकासाचा हा प्रवास यापुढेही सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी अरुणराव होळकर, प्रशांत गायकवाड, विठ्ठल जपकर, सरपंच सविता जपकर, उपसरपंच बंडू जपकर, बापू सोनवणे, संजय जपकर, उमर सय्यद, भाऊसाहेब होळकर, बाबासाहेब होळकर, अशोक जपकर, ज्ञानेश्वर जपकर यांच्यासह ग्रामस्थ, पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाण्यासाठी शेतकऱ्यांचा कालव्यांवर एल्गार!

पाटबंधारे विभागाच्या भूमिकेवर संताप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : कुकडीचे आवर्तन सुटले आणि गावोगावी कालव्यांवर शेतकऱ्यांची पाण्यासाठी झुंबड उडाली. ऐन पावसाळ्यात पावसाने मोठी दडी मारल्याने शेतीपिके पाण्याअभावी करपण्याच्या मार्गावर आहेत. डोळ्यांसमोर उभी पिके जळून जाताना पाहण्यापेक्षा काहीही करून पाणी मिळवायचे, या निर्धाराने शेतकरी कालव्यांकडे धाव घेत आहेत. मात्र, शेतकऱ्यांची ही आर्त हाक पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचे चित्र आहे.

एकीकडे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत असताना दुसरीकडे शेती वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. कर्जत-जामखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना पाणी देताना पाटबंधारे विभागाची मोठी कसरत होत असल्याचे दिसत आहे. मात्र, अगोदर कर्जत-जामखेड आणि त्यानंतर पुणे जुन्नर, अशा पाणीवाटपाच्या संघर्षात श्रीगोंदा तालुक्याच्या वाट्याला अनेकदा प्रतीक्षाच येत असल्याची शेतकऱ्यांची भावना आहे.

श्रीगोंद्याच्या शेतकऱ्यांनी नेमके कोणाकडे दाद मागायची? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. कालव्यात पाणी आले की शेतकरी पिके वाचविण्यासाठी पाणी घेण्याचा प्रयत्न करतात; मात्र त्यातून पाटबंधारे विभागाचे कर्मचारी आणि शेतकरी यांच्यात वाद निर्माण होत आहेत.

पाणी घेतल्याच्या कारणावरून अनेक शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुरू असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. शेतकऱ्यांसमोर आता पुढे आड आणि मागे विहीर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

पाणी मिळाले नाही तर पिके जळणार आणि पाणी घेण्याचा प्रयत्न केला तर गुन्हे दाखल होण्याची भीती! अशा कात्रीत श्रीगोंद्याचा बळीराजा सापडला आहे.पाणी हे शेतकऱ्यांचे जगण्याचे साधन आहे, गुन्हेगारीचे कारण नाही. कालव्याच्या पाण्याचे नियोजन करताना तालुकानिहाय समान न्याय, पारदर्शक आवर्तन आणि प्रत्यक्ष सिंचनाची गरज लक्षात घेणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यापेक्षा त्यांना नियोजनबद्ध पद्धतीने पाणी कसे मिळेल, यासाठी पाटबंधारे विभागाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

यशवंत विद्यालयाच्या १९९७-९८ बॅचचा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शिराळ चिचोंडी : पाथर्डी तालुक्यातील जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे ’यशवंत विद्यालय, शिराळ’ या शाळेतील सन १९९७-९८ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा दत्ताचे शिंगवे येथील ’जय हनुमान भक्तीधाम दत्त देवस्थान’ परिसरात अत्यंत उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडला.

जवळपास अठ्ठावीस वर्षांनंतर एकत्र आलेल्या या मित्रमैत्रिणींनी जुन्या शालेय आठवणी, गमतीजमती आणि सुख-दुःखांना उजाळा दिला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या परिपाठाप्रमाणे राष्ट्रगीत, प्रार्थना आणि हजेरीने झाली. त्यानंतर प्रत्येक माजी विद्यार्थ्याने आपला परिचय करून दिला. यावेळी सादर झालेली गाणी, कविता, गवळणी आणि मनमोकळ्या गप्पांमुळे सर्वजण पुन्हा एकदा आपल्या बालपणात हरवून गेले.



प्रत्येकाच्या चेहऱ्यावर जुन्या मित्रांना भेटल्याचा आनंद स्पष्टपणे दिसत होता.

या स्नेहमेळाव्यासाठी उदरमल, सोकेवाडी, शिराळ आणि दत्ताचे शिंगवे येथील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये गीता घोरपडे, मनिषा गायकवाड, अंजली पावशे, प्रतिभा नलंगे, आदिनाथ घोरपडे, संदीप म्हस्के, सुनिल तुपे, साईनाथ चव्हाण, नानासाहेब पालवे, संतोष कराळे, संतोष घोरपडे, रोहिदास थोरात, सतिष नजन, गणेश पावशे, बाबू बोरुडे, संदीप तुपे, ज्ञानदेव राशिनकर, राजेंद्र दातीर, अजिनाथ मुळे, रामदास मुळे, तानाजी गोरे, राजेंद्र गोरे आणि अशोक गडाख यांच्यासह असंख्य मित्रमंडळींची उपस्थिती लाभली.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी दत्ताचे शिंगवे येथील माजी विद्यार्थ्यांनी विशेष पुढाकार घेतला होता. संदीप घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्धव घोरपडे, ज्ञानदेव भवार, किरण भवार, बाळू आव्हाड, सुभाष आव्हाड आणि अशोक मुळे यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन अर्जुन घोरपडे यांनी केले, तर आदर्श शिक्षक आसाराम आव्हाड सर यांनी आपल्या खास शैलीत सूत्रसंचालन केले. विद्यार्थी आणि शिक्षकांवरील भावस्पर्शी कवितेने या अविस्मरणीय स्नेहमेळाव्याची सांगता झाली.

भाड्याने दिलेल्या मालमत्तेवरच मालकी हक्काचा दावा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शहरातील सावेडी परिसरातील वैभव कॉलनी येथील मालमत्तेच्या ताब्यावरून मालमत्ताधारक आणि भाडेकरू यांच्यातील वाद चांगलाच चिघळला आहे. राहण्यासाठी भाड्याने दिलेल्या मालमत्तेवर आता खरेदी-विक्रीचा दावा करण्यात येत असल्याने हे प्रकरण न्यायालयात पोहोचले आहे. तब्बल ६५ ते ७० लाख रुपये बाजारमूल्य असलेली मालमत्ता केवळ ३३ लाख रुपयांत मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप मालमत्ताधारक संजय भंडारी आणि सुरेखा भंडारी यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे शहरप्रमुख किरण काळे यांच्यावर केला आहे. याप्रकरणी न्यायालयीन लढा सुरू असतानाच मालमत्तेचा ताबा परत मिळावा, थकीत भाडे वसूल व्हावे आणि संबंधितांवर योग्य ती कारवाई व्हावी, या मागणीसाठी भंडारी दाम्पत्याने अपर पोलीस अधीक्षक वैभव कुलकर्णे यांच्याकडे निवेदनाद्वारे दाद मागितली आहे.

किरण काळे यांच्यावर भंडारी दाम्पत्याचे गंभीर आरोप!

भंडारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सप्टेंबर २०१८ मध्ये वैभव कॉलनी, सावेडी येथील तळमजल्यावरील सुमारे ७५० चौरस फुटांची जागा किरण गुलाबराव काळे यांना दरमहा सहा हजार रुपये भाड्याने राहण्यासाठी देण्यात आली होती. त्यावेळी भाडेकरार करण्याबाबत विचारणा केली असता, आधारकार्ड आणि पॅनकार्ड हरवले असून ऑक्टोबर २०१९ मधील निवडणुकीनंतर आवश्यक कागदपत्रे देऊन करार करू, असे आश्वासन दिल्याचे भंडारी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे या प्रकरणात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष घालून योग्य ती चौकशी करावी, भाडेकरारातील अटींचे पालन करून मालमत्तेचा ताबा मिळवून द्यावा, थकीत भाडे मिळावे आणि मालमत्तेवरील खरेदीच्या दाव्याबाबत न्याय मिळावा, अशी मागणी संजय व सुरेखा भंडारी यांनी केली आहे.

गाड्या-घोड्या, मठ व सभोवताली सेवकांचा गराडा म्हणजे साधुत्व नव्हे : माधव बाबा

अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : धार्मिकतेपेक्षा त्याचे अवडंबर करत केवळ प्रतिष्ठेसाठी धर्माचरण होत असेल तर अशा साधकाला कसलेही फळ न मिळता धर्म विचारांची अपकीर्ती केल्याचा दोष लागतो. इतर क्षेत्राप्रमाणे धार्मिक क्षेत्रातही अशा भोंदू साधकांनी धर्म अधिक बदनाम केला आहे. त्याग , साधना, सेवा, दान व तीर्थयात्रांच्या माध्यमातून धर्माची अनुभूती लवकर होते, असे मत शंकर महाराज मठाचे संस्थापक माधव बाबा यांनी व्यक्त केले.

शंकर महाराज यांचे प्रकट दिनानिमित्त आयोजित धर्मविचार कार्यक्रमात ते बोलत होते. राज्याच्या विविध भागातून भाविक मोठ्या संख्येने उत्सवासाठी पहाटेपासूनच मठामध्ये दाखल झाले. शहरातील ज्येष्ठ व्यापारी किरण काजळे यांच्या हस्ते महापूजा होऊन त्यांच्याच वतीने भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.

नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, तालुका संघाच्या संचालिका सिंधूताई साठे, आदी मान्यवरांच्या हस्ते पालखी सोहळ्याचे पूजन करत मठातून पालखीने खोलेश्वर मंदिराकडे प्रस्थान केले. तेथून ग्रामदैवत खोलेश्वरच्या मंदिरात पूजा अर्चा होऊन पालखी मिरवणुकीला प्रारंभ झाला. वाजत गाजत ग्रामप्रदक्षिणेने पालखी सोहळ्याची सांगता मठामध्ये झाली.



सोनटक्के, सुभाष बोरुडे, व मनीषा उदमले, स्वामी समर्थ विद्यालयाचे संस्थापक दिलीप भांडकर, स्वामी नित्यानंद महाराज, शशिकांत सोनवणे महाराज, यासह अहिल्यानगर, पुणे, राहुरी, बीड, संभाजीनगर, नासिक, श्रीरामपूर आदी भागातील मान्यवर, साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना माधव बाबा म्हणाले, धर्माचे आचरण अत्यंत सोपे व जीवनाच्या सर्वांगीण कल्याणासाठी असून साधी, सरळ, परोपकारी, परनिंदा टाळणारी , जीवनशैली आचरणात आणणाऱ्या व्यक्तीला धर्म कळालेला असतो. लोकांचे पैसे बुडवू नका. व्यसनापासून दूर राहा. उत्पन्नाच्या मर्यादेत खर्च करा, वैयक्तिक गरजा भागवून धर्मकार्यासाठी सन्मार्गाने मिळवलेल्या धनाचा वाटा राखून ठेवा. वाम मार्गाने मिळवलेली संपत्ती रोगराई, अहंकार, शत्रू पिडा, व्यसनाधीनता, अपयश, वंश छेद करणारी असते. आशा संपत्तीच्या माध्यमातून केलेला देवधर्म देवाला सुद्धा मान्य नाही. ईश्वरावर निसिम श्रद्धा, मनामध्ये सेवाभाव व ईश्वराची एकरूप झाल्याची भावना व्यक्तिला बाह्य जगापासून अलिप्त ठेवते. अहंकारी, दुराचारी , स्वैराचारी व्यक्तिने उन्मत्तपणे कितीही दांभिकतेने धर्म केला तरी समाज अशा व्यक्तीला स्वीकारत नाही. ज्या व्यक्तीला समाज मान्यता असते, त्याच व्यक्तीला ईश्वर आशीर्वाद देतो. समाज हाच ईश्वर आहे. संत हेच कल्याणचे शाश्वत साधन आहे. अवतारी महात्मे केवळ सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी अवतार घेतात. लौकिक अर्थाने आपल्यामध्ये ते नसले तरी साधकाने स्मरण करताच प्रकट होण्याचे सामर्थ्य अशा अवतारी महात्म्यांमध्ये असते. त्यापैकी शंकर महाराज एक आहेत.

पाथर्डी वासियांचे अनेक जन्म जन्मांतरीचे भाग्य उदयाला आले. स्वप्नदृष्टांत देऊन स्वतः शंकर महाराजांनी शाश्वत निवासासाठी पाथर्डी शहराची निवड केली.

द•ख•ल



लहुजी वस्ताद साळवेंच्या समाधीस्थळी नगरचे सामाजिक कार्यकर्ते नतमस्तक

अहिल्यानगर : आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी पुणे येथील संगमवाडी पुलाजवळ असलेल्या त्यांच्या समाधीस्थळी जाऊन नतमस्तक होत अभिवादन केले. यावेळी लहुजी वस्तादांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या क्रांतिकारी कार्याला उजाळा देण्यात आला. या अभिवादन सोहळ्यास अहिल्यानगरमधील लहुसेनेचे कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त नामदेवराव चांदणे, डॉ. सुनील सकट, लहु खंडागळे, संजय त्रिभुवन, मिनाक्षीताई सकट, शेषराव कारखिले, भगवानराव वैरागर, कडुबाबा लोंढे, लक्ष्मण साबळे आदींसह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी समाधीस्थळी अभिवादन केले. दरम्यान, महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त महासंघाच्या वतीने विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. शासनाकडून पुरस्कार प्राप्त करणाऱ्यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेऊन त्यांना सन्मानपूर्वक आर्थिक व सामाजिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार प्राप्तांना दरमहा १५ हजार रुपये पेन्शन सुरू करावी, तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या एसटी बसमधून राज्यभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगचा पाचवा सिझन २१ व २२ नोव्हेंबरला रंगणार!

अहिल्यानगर : शहरातील फुटबॉल खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या पर्वाची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा येत्या २१ व २२ नोव्हेंबर रोजी नगर क्लबच्या मैदानावर रंगणार आहे. दिवस आणि रात्री अशा दोन सत्रांमध्ये फ्लडलाइटच्या प्रकाशात सामने खेळविण्यात येणार असून, शहरातील फुटबॉलप्रेमींना दोन दिवस स्थानिक खेळाडूंच्या कौशल्याचा आणि चुरशीच्या सामन्यांचा आनंद घेता येणार आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि.२१ नोव्हेंबर) संध्याकाळी होणार आहे. यंदाच्या स्पर्धेत आठ संघांमधील १०५ खेळाडू सहभागी होणार आहेत. विजेतेपदासाठी संघांमध्ये होणारी चुरस, खेळाडूंचे तंत्रकौशल्य, वेगवान खेळ आणि गोल करण्यासाठीची धडपड यामुळे स्पर्धेत चांगलीच रंगत निर्माण होण्याची अपेक्षा आहे. स्थानिक फुटबॉलपटूंना व्यावसायिक पद्धतीने खेळण्याची संधी मिळावी, त्यांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे आणि अहिल्यानगरमध्ये फुटबॉल संस्कृती अधिक मजबूत व्हावी, या उद्देशाने गेल्या चार वर्षांपासून या लीगचे आयोजन करण्यात येत आहे. यंदाच्या पाचव्या पर्वाचे विशेष आकर्षण म्हणजे पुण्यातील सिटी पुणे फुटबॉल क्लब आणि पुणे पायोनिअर्स फुटबॉल क्लबचे निवड समिती सदस्य स्पर्धेसाठी उपस्थित राहणार आहेत. ते दोन दिवस खेळाडूंच्या कामगिरीचे निरीक्षण करून उत्कृष्ट खेळाडूंची निवड करणार आहेत. निवड झालेल्या गुणवंत खेळाडूंना संबंधित क्लबच्या संघात स्थान मिळविण्याची तसेच व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अहिल्यानगरमधील खेळाडूंना शहराबाहेरील मोठ्या फुटबॉल व्यासपीठावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.

नगरच्या प्रलंबित नाट्यगृहाचा प्रश्न कधी मार्गी लागणार : कलाकारांचा महानगरपालिकेला सवाल

अहिल्यानगर : सावेडी येथील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नाट्यगृहाचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद व नगर मधील कलावंतांच्या वतीने आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे आणि महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. या प्रश्नावर तातडीची बैठक घेऊन संबंधित पदाधिकारी व अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करण्यात येईल आणि पुढील दोन ते तीन महिन्यात कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन यावेळी तिघांनीही दिले. अहिल्यानगर शहराला समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि नाट्यपरंपरेचा वारसा लाभला आहे. मात्र, शहरात अद्याप महानगरपालिकेचे सुसज्ज असे नाट्यगृह उपलब्ध नाही, ही खेदजनक बाब आहे. अहिल्यानगर येथील सावेडी परिसरातील प्रस्तावित नाट्यगृहाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले असून, या नाट्यगृहाच्या प्रतीक्षेत नगरमधील कलावंत व नाट्य रसिक आहेत. यापूर्वीही नाट्यगृहाच्या मागणीसाठी नाट्य परिषदेच्या वतीने अनेक निवेदने आणि आंदोलने करण्यात आली होती. मात्र, अद्याप हा प्रश्न मार्गी लागलेला नाही. संगमनेर, शिर्डी, श्रीरामपूर सारख्या तालुकास्तरीय शहरात पालिकेचे नाट्यगृह असताना अहिल्यानगर सारख्या महापालिकेच्या मोठ्या शहरात अद्याप स्वतःचे नाट्यगृह नाहीये याची खंत देखील कलावंतांनी व्यक्त केली. नाट्यगृहाचे बांधकाम व इतर कामे तातडीने सुरू करून पूर्ण करावे, कामाची सद्यस्थिती, मंजूर निधी, झालेला खर्च आणि उर्वरित कामाचा तपशील जाहीर करावा, बांधकाम व इतर कामे पूर्ण करण्याची निश्चित कालमर्यादा ठरवावी, तसेच कामांच्या दर्जाची तांत्रिक तपासणी करावी तसेच नाट्यगृहासाठी आरक्षित असलेल्या जागेचा मूळ उद्देश बाजूला ठेवून, त्या ठिकाणी अतिक्रमण, शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि गाळे यांसारख्या व्यावसायिक बाबींना प्राधान्य मिळाल्याचे चित्र जनतेला दिसत आहे.

राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत नगरच्या लेकीची सुवर्णभरारी

अहिल्यानगर : जिद्द, चिकाटी, कठोर मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर अहिल्यानगरच्या सलोनी प्रसाद हिने जम्मू-काश्मीर येथे आयोजित ७० व्या शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करत सलोनीने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, या स्पर्धेत संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यातून सुवर्णपदक मिळवणारी ती एकमेव खेळाडू ठरली आहे. सलोनी ही स्टार तायक्वांदो अकॅडमीची खेळाडू आहे. तिच्या या यशामागे दररोज चार ते पाच तासांचा कठोर सराव, घाम गाळण्याची तयारी, शिस्त आणि अनेक सुखसोयींचा केलेला त्याग आहे. सातत्यपूर्ण मेहनत आणि जिद्दीच्या बळावर तिने राष्ट्रीय स्तरावर सुवर्णयश संपादन केले आहे. सलोनीच्या सुवर्णपदकापर्यंतच्या प्रवासात तिचे मुख्य प्रशिक्षक गणेश धीवर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. तसेच स्टार तायक्वांदो अकॅडमीचे प्रशिक्षक रवी यादव, विशाल जंजाळ, सुनील धीवर, आकांक्षा दराडे आणि वैष्णवी कदम यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे व प्रोत्साहनामुळे तिला हे यश मिळवता आले.

दखल

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज करण्यास २५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

पुणे : क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, दिव्यांग खेळाडू तसेच साहसी उपक्रमांत सहभागी व्यक्तींना प्रदान करण्यात येणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज सादर करण्यास २५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्य शासनाच्या क्रीडा विभागामार्फत ज्येष्ठ क्रीडा महर्षींसाठी जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, महिला क्रीडा मार्गदर्शकांसाठी जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार, खेळाडू, दिव्यांग खेळाडू तसेच साहसी उपक्रमांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतात.शासनाच्या सुधारित नियमावलीनुसार सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षांच्या पुरस्कारांसाठी १२ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते.आता इच्छुक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू तसेच साहसी उपक्रमांत सहभागी व्यक्तींना अर्ज सादर करण्यासाठी १६ ते २५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत मुदतवाढ देण्यात आली आहे. इच्छुकांनी २५ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९.५९ वाजेपर्यंत केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत. अर्ज व पुरस्कारासंदर्भातील सूचना क्रीडा विभागाच्या https://sports.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरील 'ताज्या घडामोडी' या विभागात 'शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार' या शीर्षकाखाली उपलब्ध आहेत. पात्र इच्छुकांनी मुदतवाढीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जगन्नाथ लकडे जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांनी केले आहे.

कार्तिकी यात्रेसाठी १,००० मोबाईल टॉयलेट; १८० सीसीटीव्ही कॅमेरे



आळंदी : श्रीक्षेत्र आळंदी येथे होणाऱ्या कार्तिकी यात्रा संजीवन समाधी सोहळा २०२६ च्या नियोजनाला वेग आला आहे. यात्रेसाठी सुमारे एक हजार मोबाईल टॉयलेट, ४०० अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी, १८० सीसीटीव्ही कॅमेरे आणि ७०० सीटीपीटी सीट्सची व्यवस्था करण्यात येणार आहे. यात्रेपूर्वी सर्व विभागांनी आपापली कामे ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावीत, असे निर्देश खेडचे उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी दिले.

कार्तिकी यात्रेच्या पूर्वनियोजनासाठी आळंदी नगरपरिषदेच्या सभागृहात मंगळवारी (ता. १७) दौंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीचे विश्वस्त, पोलीस अधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी, यात्रा नियोजन समितीचे सभापती, नगरसेवक तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.यात्राकाळात भाविकांच्या सुरक्षिततेसाठी शहरातील प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, ४०० बॅरिकेड्स, वॉच टॉवर आणि चोवीस तास पोलीस पेट्रोलिंगची व्यवस्था करण्यात येणार आहे.

आरोग्य सुविधांसाठी दहा वैद्यकीय बूथ, रुग्णवाहिका, ऑक्सिजन बेड आणि औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध केला जाणार आहे. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी चार ठिकाणी पाणी भरणा केंद्रे उभारण्यात येणार आहेत.

पुणे जिल्ह्यातील ५१ विद्यार्थी शैक्षणिक दौऱ्यावर

'माझे गाव ते माझा देश' उपक्रमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक जाणिवा आणि अनुभवाधारित शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा परिषद, पुणे यांच्या वतीने 'माझे गाव ते माझा देश' या संकल्पनेतून ज्ञान सेतू विद्यार्थी आदान-प्रदान उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत परीक्षेद्वारे निवड झालेले पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ५१ गुणवंत विद्यार्थी आणि ९ शिक्षक जम्मू-काश्मीर, आसाम आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांच्या शैक्षणिक दौऱ्यासाठी आज १७ नोव्हेंबर रोजी रेल्वेने रवाना झाले. हे विद्यार्थी २० नोव्हेंबर रोजी पुण्यात परतणार आहेत.

देशातील भौगोलिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विविधतेचा प्रत्यक्ष अनुभव घेणे, विविध राज्यांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधणे आणि 'विविधतेत एकता' या राष्ट्रीय मूल्याची जाणीव निम ण करणे, हा उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या दौऱ्यासाठी विद्यार्थ्यांचे नऊ गट करण्यात आले असून प्रत्येक गटासाठी यजमान शाळा निश्चित करण्यात आली आहे. जम्मू-काश्मीरमधील भद्रवाह आणि पुंछ, आसाममधील दिराक, काकीपठार आणि डिब्रूगड, तसेच अरुणाचल प्रदेशातील रोइंग आणि तेजू येथील शाळांमध्ये विद्यार्थी शैक्षणिक सहअध्ययनात सहभागी होणार आहेत.

प्रवासापूर्वी विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय पूर्वतयारी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सांस्कृतिक संवेदनशीलता, संवाद कौशल्ये, प्रादेशिक माहिती आणि शैक्षणिक दौऱ्यातील अपेक्षित अनुभव याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. दौऱ्यादरम्यान विद्यार्थी यजमान शाळांमधील वर्ग, सहशालेय उपक्रम आणि स्थानिक विद्यार्थ्यांशी



संवाद यात सहभागी होतील. तसेच संबंधित प्रदेशाचा इतिहास, भूगोल, संस्कृती आणि जीवनशैलीचा परिचय करून देणारा अभ्यासदौराही आयोजित करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून जम्मू-काश्मीर, आसाम आणि अरुणाचल प्रदेशातील विद्यार्थ्यांनाही पुणे जिल्ह्याच्या भेटीसाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. या भेटीत त्यांना पुण्यातील शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक वारसा आणि स्थानिक जीवनशैली अनुभवण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे विविध राज्यांतील विद्यार्थ्यांमध्ये मैत्री, परस्पर समज आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल.

ज्ञान प्रबोधिनी, पुणे ही या उपक्रमाची अंम लबजावणी भागीदार संस्था असून, कार्यक्रमाचे नियोजन, विद्यार्थ्यांचे पूर्वतयारी मार्गदर्शन आणि यजमान शाळांशी समन्वय साधण्याची जबाबदारी संस्थेकडे आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांचे विचारविश्व व्यापक होणार : विरधवल जगदाळे

शिक्षण केवळ पाठ्यपुस्तके आणि वर्गखोलीपुरते मर्यादित नसते. या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना देशाची विविधता अनुभवता येईल, विविध संस्कृती समजून घेता येतील आणि अन्य राज्यांतील विद्यार्थ्यांशी मैत्री निर्माण करता येईल. हा अनुभव विद्यार्थ्यांचे विचारविश्व व्यापक करून त्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देईल, असे जिल्हा परिषद अध्यक्ष विरधवल जगदाळे यांनी सांगितले.

भारताची खरी ताकद विविधतेत असून, विविध राज्यांतील विद्यार्थ्यांशी संवाद आणि तेथील परंपरांचा अनुभव यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता व देशाप्रती आपलेपणाची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील यांनी व्यक्त केला.

जिल्हा परिषदेचा 'मॉडेल स्कूल' उपक्रम ग्रामीण शिक्षणाला गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यावर केंद्रित आहे. ज्ञान सेतू उपक्रमातून शिक्षण वर्गखोलीच्या पलीकडे नेण्याचा प्रयत्न असून, विद्यार्थ्यांमध्ये आत्म विश्वास, जिज्ञासा, नेतृत्वगुण आणि व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होईल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रीय एकात्मता, अखंडता आणि सुरक्षितता ही प्रत्येक भारतीयासाठी महत्त्वाची मूल्ये आहेत. ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून गेल्या १२ वर्षांपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजविण्याचे कार्य सुरू आहे. आता पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने शालेय विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचत आहे. या दौऱ्यात विद्यार्थ्यांना 'भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत' या प्रतिज्ञेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार असल्याचे ज्ञान प्रबोधिनीचे विभागप्रमुख अमर परांजपे यांनी सांगितले.

'माझे गाव ते माझा देश' या संकल्पनेतून ग्रामीण विद्यार्थ्यांना देशाच्या विविधतेची ओळख करून देत त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, जिज्ञासा, सामाजिक संवेदनशीलता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना विकसित करण्याचा जिल्हा परिषद, पुणे यांचा प्रयत्न आहे.

कृषी यांत्रिकीकरण योजनेतून ५,७९५ शेतकऱ्यांना ६५.११ कोटींचे अनुदान

अनुदानाची रक्कम आधार संलग्न बँक खात्यांवर जमा

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

पुणे : कृषी यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन देऊन शेतीची कामे अधिक सुलभ व कमी खर्चात करण्याच्या उद्देशाने पुणे जिल्ह्यात कृषी यांत्रिकीकरण योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील एकूण ५ हजार ७९५ शेतकऱ्यांना ६५ कोटी ११ लाख रुपयांचे अनुदान त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यांवर जमा करण्यात आले आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ८८९ शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी, ३६४ शेतकऱ्यांना पॉवर टिलरसाठी, २ हजार ९०२ शेतकऱ्यांना कृषी यंत्र-अवजारांसाठी, ६०० शेतकऱ्यांना कृषी अवजारे बँकेसाठी, १३ शेतकऱ्यांना किसान ड्रोनसाठी, तर २७ शेतकऱ्यांना कंबाईन हार्वेस्टरसाठी अनुदान देण्यात आले आहे.

ट्रॅक्टर व पॉवर टिलरच्या वापरामुळे शेतीची कामे सुलभ होण्यासोबतच मजुरीवरील खर्च कमी होण्यास मदत होत आहे. पॉवर टिलरचा उपयोग उसाची बांधणी, फळबागांम ध्ये भर लावणे, तणनियंत्रण व मशागतीसाठी होतो. तसेच ट्रॅक्टरचलित कल्टिव्हेटर, नांगर, ब्लोअर, ट्रॉली, चाफ कटर, ऊस पाचट व्यवस्थापन यंत्र, बेलर मशीन, शुगरकेन श्रेडर-कटर, पेंडी थ्रेशर, फवारणी व पेरणी यंत्रांसाठीही अनुदान दिले जाते.

कृषी अवजारे बँक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना १० ते २५ लाख रुपयांपर्यंतची ट्रॅक्टर व अवजारे खरेदी करता येतात. त्यासाठी ४ ते १० लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. चालू वर्षात ६०० कृषी अवजारे बँकांना एकूण २४ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

किसान ड्रोन योजनेतून १३ शेतकऱ्यांना ड्रोन खरेदीसाठी ५७ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. ड्रोनच्या माध्यमातून ऊस, इतर पिके आणि फळबागांवर फवारणी करता येते. तसेच दुष्काळी परिस्थितीत पिकांवरील पाण्याचा ताण कमी करण्यासाठी युरिया व पोटॅशची फवारणी करण्यास ड्रोन उपयुक्त ठरतो. कंबाईन हार्वेस्टरचा उपयोग गहू, हरभरा, सोयाबीन, मका आदी पिकांच्या काढणीसाठी होतो.

कृषी यांत्रिकीकरणामुळे शेतीतील श्रम, वेळ आणि उत्पादन खर्च कमी होण्यास म दत होत असून, शेतकऱ्यांनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

ग्रामपंचायत रांजे ता. भोर जि.पुणे
बी-१ निविदा सूचना - १/२०२६-२७

प्रशासक ग्रामपंचायत रांजे ता. भोर जि.पुणे येथे मौजे रांजे येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने नोंदणीकृत पुरवठादार/संस्था /ठेकेदार यांच्याकडून निविदा बी-१ पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये दरपत्रक मागविण्यात येत आहे. दि. १७/११/२०२६ सकाळी. १०.०० ते २५/११/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात. सदर निविदा दि २७/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय मध्ये उघडण्यात येतील.

अ.क्र.	कामाचे नाव	परिणाम	कामाचा कालावधी	अनामत रकम	ठेकदार वर्ग
१	मौजे रांजे ता. भोर कार्यक्षेत्रातील सर्व मिळकतीचे फेर आकारणी करणे, मिळकत जिओ फेन्सिंग करणे व मिळकत नकाशे तयार करून मिळणेबाबत.	प्रती मिळकत दर	६ महिने	५०००/	पुरवठादार/ संस्था / ठेकेदार
	मौजे रांजे येथे घरा-घरातून ग्रामपंचायतीने संकलन केलेला ओला व सुका कचरा व इतर सर्व कचरा त्याची वाहतूक करणे व कचरा विलगीकरणासाठी मनुष्यबळ उपलब्ध करणे.	प्रतिमाह	६ महिने	५०००/	पुरवठादार/ संस्था / ठेकेदार

निविदा अटी व शर्ती १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत रांजे या नावाने चेक/कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत रांजे या नावाने चेक/कॅश ऑनलाईन/डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत रांजे ता. भोर, जि. पुणे

शिक्षक पतसंस्थेच्या सभापतीपदी मिनाक्षी संतोष वळसे पाटील यांची बिनविरोध निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

निरगुडसर : आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सभापतीपदी मिनाक्षी संतोष वळसे पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. तसेच उपसभापतीपदी अभिजीत बाळकृष्ण नाटे, खजिनदारपदी शंकर सिताराम गवारी आणि मानद सचिवपदी बाळासाहेब भिमाजी साबळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

मंचर येथील संस्थेच्या सभागृहात मंगळवारी, १७ नोव्हेंबर रोजी ही निवड प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक पौर्णिमा सुर्वे यांनी निवडणुकीचे कामकाज पाहिले. या निवड प्रक्रियेप्रसंगी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष महेश बढे, एम.एड.



उच्च शिक्षीत शिक्षक कृती समितीचे राज्य अध्यक्ष राजू जाधव, जिल्हा संघाचे माजी अध्यक्ष दत्तात्रय वाळूज, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक बाळासाहेब कानडे, जिल्हा शिक्षक संघाचे उपाध्यक्ष नंदकुमार चासकर, जिल्हा संघटक उदयकुमार लोंढे, जिल्हा प्रतिनिधी विजय वळसे, माजी शिक्षक संघ तालुका अध्यक्ष सचिन तोडकर, तालुका अध्यक्ष सुनिल भेके, शिक्षक नेते नारायण काळे, सरचिटणीस विकास बाणखेले, कोषाध्यक्ष विजय डोके, माजी सभापती मंगेश जावळे, तालुका बी.एड. कृती समितीचे अध्यक्ष सुभाष इंदोरे, दत्तात्रय काळे, संस्थेचे सभापती कान्होबा डोंगरे, उपसभापती सोपान सैद, मानद सचिव सखाराम मुंजाळ, संचालक भास्कर चासकर, नारायण गोरे, संजय केंगले, संतोष लबडे, दत्तात्रय मेचकर, बाबाजी गाढवे, संतोष पोखरकर आणि सुरेखा तोडकर आदी मान्यवर उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या आर्थिक प्रगतीची माहिती देताना सभापती मिनाक्षी वळसे पाटील म्हणाल्या वार्षिक उलाढाल १२६ कोटी ४८ लाख ९२ हजार रुपये आहे.२०२५-२६ मध्ये संस्थेला दोन कोटी २६ लाख १५ हजार रुपयांचा नफा झाला आहे.यावेळी दत्तात्रय वाळूज, महेश बढे, नंदकुमार चासकर, सुनील भेके आणि कान्होबा डोंगरे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार तालुका सरचिटणीस विकास बाणखेले यांनी मानले.

ग्रामपंचायत रांजे ता. भोर जि.पुणे
बी-१ निविदा सूचना - २/२०२६-२७

प्रशासक ग्रामपंचायत रांजे ता. भोर जि.पुणे येथे मौजे रांजे येथे खालील कामासाठी बी-१ पद्धतीने नोंदणीकृत पुरवठादार/संस्था /ठेकेदार यांच्याकडून निविदा बी-१ पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये दरपत्रक मागविण्यात येत आहे. दि. १७/११/२०२६ सकाळी. १०.०० ते २५/११/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात. सदर निविदा दि २७/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा ग्रामपंचायत कार्यालय मध्ये उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सह	अंदाजपत्रकीय रक्कम जीएसटी सोडून	इसारा रक्कम	कोरे निविदा रक्कम	कामाचा कालावधी	ठेकेदार वर्ग
१	मौजे रांजे ता. भोर येथील वैभव इलेक्ट्रॉनिक कंपनी ते वन्नेस कंपनी पर्यंत सिमेंट रस्ता करणे	४९९८६०/-	४२२२१४/-	४२२२/-	२३६/-	६ महिने	खुला
२	मौजे रांजे ता. भोर येथील वन्नेस कंपनी ते लक्ष्मण जांभूळकर घर सिमेंट रस्ता करणे	४९९९६५/-	४२२३०३/-	४२२३/-	२३६/-	६ महिने	खुला

निविदा अटी व शर्ती १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत रांजे या नावाने चेक/कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत रांजे या नावाने चेक/कॅश ऑनलाईन/डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत रांजे ता. भोर, जि. पुणे

पाडव्याचं सोनं शाळेच्या झोळीत!

माजी विद्यार्थ्यांनी लुटवलं प्रेम, गावागावात गुरुदक्षिणेचा सोहळा

अनिकेत नितीन काळे । राष्ट्र सह्याद्री

सासवड : दिवाळीचा पाडवा म्हणजे पत्नीचा सण, असं आपण म्हणतो. पण यंदा पुरंदरकरांनी पाडव्याला नवा अर्थ दिला. आपल्या जुन्या शाळेसाठी, आपल्या गुरुजींसाठी, आपल्या गावच्या पोरांसाठी माजी विद्यार्थी पुन्हा एकदा शाळेच्या उंबरठ्यावर आले. आणि येताना रिकाम्या हाताने नाही, तर भरभरून दातृत्व घेऊन आले.

पुरंदर तालुक्यातील दोनशे अकरा शाळांमध्ये एकाच दिवशी माजी विद्यार्थी मेळावा झाला. चार हजार चौसष्ट जुन्या मित्र-मैत्रिणी एकत्र आल्या. गप्पा झाल्या, जुन्या आठवणी जाग्या झाल्या, गुरुजींचा सन्मान झाला आणि शेवटी शाळेच्या भल्यासाठी तेवीस लाख पाच हजार चारशे अठ्ठावन्न रुपयांची मदत जाहीर झाली. ही रक्कम केवळ पैशांची नाही, तर काळजाशी जोडलेल्या नात्याची पावती आहे.

काय मिळालं शाळांना?

शिक्षण अधिकारी राजकुमार बामणे यांच्या माहितीनुसार, वस्तूंच्या रूपात एकोणीस लाख ब्याण्णव हजार पाचशे चौपन्न रुपये, रोख स्वरूपात दोन लाख एकोणतीस हजार एकाहत्तर रुपये आणि इतर मदतीतून त्याऐंशी हजार आठशे तेहतीस रुपये जमा झाले. यातून संगणक आले, डिजिटल सुविधा आल्या, खेळाचं साहित्य



आलं, वह्या-पुस्तकं आली, वर्गखोल्या सजल्या आणि पिण्याच्या पाण्याची सोय झाली.

जेजुरीने मारली बाजी!

या वेळी सगळ्यांचं लक्ष लागलं होतं ते जेजुरीकडे. जिल्हा परिषद शाळा क्रमांक दोनला एकट्याला चार लाख शहात्तर हजार नऊशे पंचेचाळीस रुपयांची मदत मिळाली. नऊ संगणक, चार स्क्रीनचा सीसीटीव्ही, प्रथमोपचार पेटी, शाळेच्या बॅगा आणि वह्या असं सगळं काही मिळालं. गंमत म्हणजे, या कामात माजी विद्यार्थ्यांच्या मुलांनीही पुढाकार घेतला. हेंकल कंपनी आणि किर्लोस्कर फाउंडेशनकडून मदत मिळवून दिली. बापाचं ऋण लेकाने फेडावं, यापेक्षा गोड काय असू शकतं?

धालेवाडीचा झेंडा सर्वात उंच

गटांमध्ये धालेवाडी गटाने पाच लाख चौपन्न हजार चारशे चौपन्न रुपयांची मदत देत पहिलं स्थान पटकावलं. नीरा गटाने तीन लाख एकोणसत्तर हजार रुपये देत दुसरं स्थान मिळवलं. नाझरे सुपे गटाने एक लाख एकाहत्तर हजार रुपये जमवले. रोख रकमेत मात्र भिवडी गट पुढे होता, त्यांनी एक लाख दहा हजार शंभर रुपये दिले.

माणसांच्या गर्दीत वाल्हे गटाने विक्रम केला. तिथे चारशे वीस माजी विद्यार्थी जमले. शिंदेवाडीला दोनशे, वाल्हेला त्र्याण्णव, भोरवाडीला पासष्ट, बोपगाव आणि राखला प्रत्येकी एकसष्ट, तर भिवरीला त्रेपन्न जण आले.

प्रत्येक गावाची वेगळी गोष्ट

भिवडी गटातील पंधरा शाळांमध्ये दोनशे चौदा जण आले. म्हस्कोबावाडीला प्रिंटर मिळाला, धरणवस्तीला खेळाचे कपडे मिळाले, कोडीतला पाण्याची टाकी मि ळाली, कुंभोशीत रंगरंगोटी झाली. चांबळी गटातील बारा शाळांमध्ये दोनशे सदुसष्ट जण जमले. बोपगावला साउंड सिस्टीम, गणेशवाडीला ट्रॅकसूट, नाटकरवाडीला शाळेची कमान मिळाली. भिवरीत गेट आणि दोन डझन खुर्च्या देण्याचं ठरलं, तर हिवरे गावात मैदान घडवण्याचा निर्धार झाला. धालेवाडी गटात कोथळेला पेव्हिंग ब्लॉकसाठी पंचवीस हजार रुपये, जगतापवस्तीला प्रिंटरसाठी सोळा हजार नऊ रुपये, जेजुरी स्टेशनला मैदानासाठी दहा हजार रुपये मिळाले.

दिवे गटात काळेवाडी शाळेसाठी दोन मजली इमारतीचं स्वप्न पाहिलं गेलं. गराडे गटात सोमुर्डीला तीस हजार रुपयांचा संगणक मिळाला. काळदरी गटात कोंडकेवाडीला त्रेचाळीस इंची एलईडी टीव्ही, धनकवडीला सदतीस हजार पाचशे रुपयांची मदत मिळाली. तिथे बोलक्या भिंतींची कल्पना सगळ्यांना आवडली.

नीरा गटात मांडकी आणि नीरा क्रमांक दोनला प्रिंटर, नीरा क्रमांक एकला संगणकाचं आश्वासन मिळालं. पिसर्वे गटात बाळवाडीला दहा हजार रुपयांचा फिल्टर, एखतपूरला दहा हजार पाचशे रुपयांची साउंड सिस्टीम मिळाली.

राख गटात कुदळेवाडीला बत्तीस हजार रुपयांचा स्मार्ट टीव्ही मिळाला. सुपे खुर्द गटात पानवडीला बावीस हजार रुपयांची घसरगुंडी मिळाली. दुष्काळातही बोरालेमळाच्या माजी विद्यार्थ्यांनी वह्या आणि पेन्सिल दिल्या. वाल्हे गटात वागदरवाडीच्या विद्यार्थ्यांनी तीन हजार रुपयांची झाडं स्वतःच्या हाताने लावली.

शेवटचं सत्य

शाळेने दिलेलं ज्ञान पैशात मोजता येत नाही. पण पुढच्या पिढीसाठी आपण काहीतरी करतोय, ही भावनाच खरी गुरुदक्षिणा आहे. पुरंदरने यंदा पाडवा फक्त साजरा केला नाही, तर तो जपला.

द•ख•ल

डॉ. धुले यांचे चीनमधील वैद्यकीय शिक्षणानंतर मेडिकल इन्स्टिट्यूट परीक्षेत यश

खरवंडी कासार : पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथील डॉ. संजय धुले यांचे चिरंजीव डॉ. संकेत धुले यांनी चीनमधील नॅनटॅग मेडिकल युनिव्हर्सिटी मध्ये वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर घेतलेल्या



मेडिकल इन्स्टिट्यूट (एक्झामिनेशन) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. डॉ. संकेत धुले यांनी चीनमध्ये वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून मायदेशी परतल्यानंतर ही महत्त्वपूर्ण परीक्षा दिली होती. या परीक्षेत त्यांनी मिळवलेल्या यशामुळे धुले कुटुंबासह खरवंडी कासार गावात आनंदाचे वातावरण आहे. त्याचे आजोबा निवृत्त शिक्षक श्री रावसाहेब घुले सर यांचे लहानपनापासून संस्कार व मागदर्शन मिळाले.त्यांच्या या यशाबद्दल खरवंडी कासार पंचक्रोशीतील तसेच राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहे.

समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला विद्यापीठाचे पीएच.डी. संशोधन केंद्र मंजूर

निघोज : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथील एमबीए (व्यवस्थापन) विभागाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. संशोधन केंद्राची मान्यता प्राप्त झाली आहे. संशोधन आणि उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील ही महत्त्वपूर्ण उपलब्धी असून, समर्थ शैक्षणिक संकुलाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यापीठाच्या निर्धारित निकषांनुसार आवश्यक असणाऱ्या संशोधन सुविधा, शैक्षणिक पायाभूत व्यवस्था आणि अनुभवी संशोधन मार्गदर्शकांची उपलब्धता यांची पूर्तता केल्यानंतर एमबीए विभागाला ही मान्यता मिळाली आहे. या संशोधन केंद्रासाठी विभागात तीन मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक कार्यरत आहेत. यामध्ये मानव संसाधन व्यवस्थापन व ऑपरेशन्स मॅनेजमेंट या विषयांसाठी डॉ. महेश भास्कर, ऑपरेशन्स मॅनेजमेंटसाठी डॉ. रुस्तुम दराडे आणि वित्तीय व्यवस्थापन या विषयासाठी डॉ. शशिकांत ताजणे यांचा समावेश आहे. या संशोधन केंद्राच्या मान्यतेमुळे व्यवस्थापनशास्त्रातील विविध विषयांवर सखोल संशोधन करण्यासाठी संशोधकांना संस्थेमध्येच शैक्षणिक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. विशेषतः मानव संसाधन व्यवस्थापन, वित्तीय व्यवस्थापन, ऑपरेशन्स मॅनेजमेंट तसेच उद्योग आणि व्यवसाय व्यवस्थापनाशी संबंधित आधुनिक संकल्पना, समस्या व आव्हाने यांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यास चालना मिळणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती विकसित होण्याबरोबरच संशोधन क्षेत्रातील गुणवत्ता, नावीन्यपूर्ण विचार आणि ज्ञाननिर्मितीला प्रोत्साहन मिळणार आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि बदलत्या औद्योगिक व व्यावसायिक वातावरणात व्यवस्थापनशास्त्रातील संशोधनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या महत्त्वपूर्ण मान्यतेबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ नरवडे, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, एमबीए विभागप्रमुख डॉ. महेश भास्कर तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे आभार मानले. या यशाबद्दल महाविद्यालयातील सर्व संबंधितांचे अभिनंदन करून पुढील संशोधनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विवाहितेला हुंड्यासाठी शारीरिक व मानसिक त्रास; गुन्हा दाखल

अहिल्यानगर : शहरातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका विवाहितेला माहेरवरून पाच लाख रुपये व्यवसायासाठी घेऊन येण्याच्या कारणावरून सासरच्या मंडळींकडून मारहाण केल्याची व शिवीगाळ केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. प्राप्त झालेल्या पोलीस माहितीनुसार ही घटना सुलतानपूर रोडवरील बी. एड. कॉलेज रोड, मंत्र, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे येथील परिसरात घडली असून या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी विवाहितेने दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी पती दानिश हुसेनखान पठाण, सासू आलिआ हुसेनखान पठाण, सासरे हुसेनखान बाबुखान पठाण आणि नणंद नमरा हुसेनखान पठाण यांनी पीडित महिलेस शारीरिक व मानसिक त्रास दिला आहे. आरोपींनी फिर्यादी विवाहितेला व्यवसायाकरिता माहेरवरून पाच लाख रुपये घेऊन येण्यास सांगितले होते आणि पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. मारहाण केल्यानंतर आरोपींनी विवाहितेला अत्यंत वाईट शब्दांत शिविगाळ केली तसेच तुला काय करायचे ते कर अशी धमकी देऊन जीवे मारण्याची भीती दाखवली आहे. या प्रकरणी पीडित महिलेने भरोसा सेल अहिल्यानगर येथे अर्ज केल्यानंतर तिथून प्राप्त झालेल्या पत्रानुसार तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याची नोंद भारतीय न्याय संहितेच्या कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) प्रमाणे करण्यात आली असून तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जगदिश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार संतोष गव्हाणे करत असून महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

'मलाच सगळं हवं' पिसाळांचा हा अट्टाहास बरा नव्हे : प्रकाश शिंदे

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मुलाचा पराभव का झाला याचे उत्तर आपलीच कार्यपद्धती आहे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कर्जत : अहिल्यानगर जिल्हा बँकेची निवडणूक पक्षीय नसून ती सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हिताची आणि विस्थापितांच्या हक्काची निवडणूक आहे. त्यामुळे माजी संचालकांचा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि भाजपावरचा राग अनाठायी आहे. ते भाजपाचे होते तर त्यांनी राम शिंदेंच्या उमेदवारीस आपला जाहीर पाठींबा देणे गरजेचे होते. केवळ आपल्याच घरात पद हवे हा अट्टहास राजकारणात चांगला नसतो असा टोला जिल्हा बँकेचे संचालक प्रकाश शिंदे यांनी अंबादास पिसाळ यांना लगावला. ते सोमवारी कर्जत येथे जिल्हा बँकेच्या सभागृहात पत्रकार परिषदेत बोलत होते.

कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघात माजी संचालक अंबादास पिसाळ यांच्या पुत्राचा पराभव झाला. राम शिंदे समर्थक ज्योती प्रकाश शिंदे यांनी तब्बल ३४ मतांनी तुषार पिसाळ यांचा एकहाती पराभव केला. यावर अंबादास पिसाळ यांनी आपण भाजपात असताना राम शिंदेंनी आपल्या पराभवासाठी फिल्डिंग लावल्याचे प्रसार माध्यमात सांगितले. त्यास सोमवारी प्रकाश शिंदे यांनी प्रती उत्तर दिले. जिल्हा बँकेची निवडणूक ही पक्षीय निवडणूक नव्हती. वास्तविक पाहता विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी मागील वर्षीच आपण अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या राजकारणात लक्ष घालणार असल्याचे सूतोवाच केले होते. त्या अनुषंगाने त्यांनी जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील जाणकार राजकीय मंडळींची भेट घेत उमेदवारी करण्याबाबत पाऊले उचलली. त्यावेळी मागील पंचवार्षिक निवडणुकीत ज्यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान केले होते. त्या अंबादास पिसाळ यांनी कधीच राम शिंदेंच्या उमेदवारीस आपला पाठींबा जाहीर केला नाही. किंवा त्याबाबत साधा संवाद देखील घडवून आणला नाही. त्यावेळी मिठाची गुळणी घेत शांततेची भूमिका घेतली. तोपर्यंत यांना सर्वसामान्य शेतकरी आठवला नाही. आज सर्वसामान्य कार्यकर्ता राम शिंदेंनी जिल्हा बँकेच्या संचालक पदावर विराजमान केला म्हणून यांना पोटशूळ उठला का ? असा सवाल प्रकाश शिंदेंनी उपस्थित केला.

खरं पाहता सभापती राम शिंदे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत पॅनलची उभारणी करीत असताना यांनी स्वताची उमेदवारी का मागितली नाही ? आणि आता आपल्यावर अन्याय केल्याची कोल्हेकुई करीत आहे. विखे-थोरात गटांनी आपल्यास उमेदवारी का दिली नाही ? याचे आत्मपरीक्षण करण्याचे सोडत उलट ज्यांनी कर्जतच्या स्थानिक राजकारणात आपणास कायम सोबत घेतले त्यांच्यावर आज विनाकारण तोंडसुख घेत आहात हे आपल्याला न शोभणारे आहे. तुम्ही विखेंचे नेतृत्व झुगारून आमदार रोहित पवारांच्या इशाऱ्यावर ही जिल्हा बँकेची निवडणूक घडवून आणली. आपण पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि माजी खासदार सुजय विखेंसोबत देखील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीप्रमाणे विश्वासघात केल्याचा गंभीर आरोप प्रकाश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत केला. त्यामुळे केवळ आपल्या पराभवाचे खापर राम शिंदेंवर न फोडता स्वताच्या कार्यपद्धतीचे देखील एकदा आत्मपरीक्षण करा. निश्चित आपल्या पराभवास आपलीच कार्यपद्धती कारणीभूत असल्याचा आपणास साक्षात्कार होईल अशी टीका अंबादास पिसाळ यांचे नाव न घेता केली.

मी सर्व सोसायटी आणि मतदारांची प्रतिनिधी : ज्योती प्रकाश शिंदे

निवडणूक झाली की मतभेद संपतात ही विधान परिषदेचे सभापती राम शिंदे साहेबांची शिकवण. त्यामुळे ५४ विरुद्ध २० असा जरी निकाल लागला असला तरी आपण कर्जत तालुक्यातील ७६ सेवा-सोसायटीचे प्रतिनिधी म्हणून निस्वार्थ आणि पारदर्शकपणे राम शिंदेंच्या मार्गदर्शनाखाली काम करणार आहोत. त्यामुळे मी जिल्हा बँकेच्या संचालक पदावर काम करताना कोणाच्याही बाबतीत मनात ईर्षा किंवा सुडाची भावना न ठेवता सर्वसमावेशक काम करण्यावर भर देणार असल्याचे मत नूतन संचालिका ज्योती प्रकाश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

कारची काच फोडून वकिलांच्या पर्सची चोरी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिवसाढवळ्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, नगर-कल्याण रोडवरील हॉटेल ऑरेन्ज व्हॅली समोरील रस्त्यावर उभी केलेल्या कारची काच फोडून अज्ञात चोरट्यांनी वकिलांच्या पर्समधील रोख रक्कम आणि महत्त्वाची कागदपत्रे लांबवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी वकील तेजस्वी विलास तवले यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे.

फिर्यादी वकील तेजस्वी विलास तवले यांनी त्यांची चारचाकी गाडी क्रमांक एमएच १६ डी एल ००२८ ही हॉटेल ऑरेन्ज व्हॅली समोरील रस्त्यावर लावली होती आणि त्या जेवढे पार्सल आणण्यासाठी गेल्या होत्या. त्याच दरम्यान अज्ञात चोरट्यांनी संधी साधून गाडीच्या मागील बाजूची डावीकडील काच फोडून आणि ब्रेकचे नुकसान करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गाडीत ठेवलेली पर्स चोरून नेली.

चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये चार हजार पाचशे रुपये रोख रक्कम, ज्यामध्ये पाचशे रुपयांच्या आठ नोटा आणि शंभर रुपयांच्या पाच नोटांचा समावेश होता. तसेच सॅमडिस्क कंपनीचा पेनड्राइव्ह, ओळखपत्र, पॅन कार्ड, गाडीचे आरसी बुक, ड्रायव्हिंग लायसन्स, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे ओळखपत्र आणि इतर किरकोळ सामान असा ऐवज चोरट्यांनी लांबवला. फिर्यादीने उशिरा तक्रार दिल्याने विलंबाचे कारण स्पष्ट झाले असून, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे.

न्याय देणाऱ्यांनाच न्यायासाठी संपावर जाण्याची वेळ! कर्जत न्यायालयातील शंभर टक्के कर्मचारी संपात सहभागी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : न्यायदानासारखी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडणाऱ्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाच आज आपल्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. उच्च न्यायालयाने मंजूर केलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारला आहे. या राज्यव्यापी आंदोलनाचे तीव्र पडसाद कर्जत न्यायालयातही उमटले असून, येथील सर्व कर्मचाऱ्यांनी शंभर टक्के सहभाग नोंदविल्याने न्यायालयीन कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे.

चार संघटना एकवटल्या; समान काम, समान वेतनाचा बुलंद आवाज!

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट क), महाराष्ट्र स्टेट ज्युडिशियल स्टेनोग्राफर्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलिफ कर्मचारी महासंघ आणि महाराष्ट्र राज्य न्यायालयीन गट ड कर्मचारी महासंघ या चारही संघटना एकत्र आल्या आहेत. 'चार संघटना, एकच निर्धार; समान काम, समान वेतन मिळालेच पाहिजे!' या घोषणेसह कर्मचाऱ्यांनी आपल्या हक्काच्या लढ्याला सुरुवात केली आहे.

अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या नेतृत्वाखाली कर्जत न्यायालयातील कर्मचाऱ्यांनीही एकजुटीचे दर्शन घडवत संपात सहभाग घेतला. न्यायालयीन प्रक्रियेतील महत्त्वाचा दुवा असलेले कर्मचारी दिवसरात्र आपली जबाबदारी पार पाडत असताना त्यांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न प्रलंबित राहणे ही बाब अन्यायकारक असल्याची भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

उच्च न्यायालयाने मंजूर केलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, ही कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. ही मागणी कोणतीही अवास्तव अपेक्षा नसून न्याय्य हक्क असल्याची भूमिका कर्मचाऱ्यांनी मांडली आहे. शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनाला कर्जत तालुका वकील बार असोसिएशनने जाहीर पाठिंबा दिला आहे. न्यायालयीन यंत्रणेचा अविभाज्य भाग असलेल्या कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांच्या पाठीशी वकील संघटना ठामपणे उभी राहिली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला अधिक बळ मिळाले आहे.

यावेळी ॲड. संग्राम ढेरे (अध्यक्ष, वकील बार असोसिएशन),ड. सचिन रेणुकर. ड. राम दहिवळकर, ड. सुरेश वाकडे, ड. रोहित वाकडे, ड. निखिल दोभाडा, ड. हरिश्चंद्र राऊत, ड. धनराज राणे, ड. विश्वास घालमे, ड. मच्छिंद्र तसेच यांच्यासह वकील बांधवांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

कलावंताना शासन दरबारी मदतीसाठी पाठपुरावा करणार : रविंद्र राजदेव

खा.नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली लढा उभारणार



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

टाकळी ढोकेश्वर : महाराष्ट्र ही कलावंतांची भूमी असुनही सध्याच्या काळात लोककला लोप पावत चाललेली आहे परंतु महाराष्ट्र सरकारचे त्याकडे लक्ष नाही परंतु महाराष्ट्रातले सगळे कलावंतांच खा.नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रालयावर मोर्चा काढून कलावंतांचा अनुदानाचा मार्ग मोकळा करावा लागेल असे प्रतिपादन निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रवींद्र राजदेव यांनी केले. पारनेर तालुक्यातील सावरगाव येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना रवींद्र राजदेव यांनी राष्ट्रपती पारितोषिक विजेत्या विठाबाई यांच्या शब्दात पोटासाठी नाचते मी परवा कुणाची यासाठी कलावंत पूर्ण क्षमतेने आपली कला दाखवत असतो.समाजाच्या भावना वेगळ्या असतात परंतु घर दार आणि लेकरं बाळ सोडून आपल्या कला दाखवत असतात.

ह्या कलावंताला मासिक मानधन मिळाले पाहिजे कला जागृत राहिली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी बाजार समितीचे संचालक शिवाजीराव बेलकर,माजी सरपंच रामभाऊ थोरात,बाळासाहेब शिरतार,अमोल चौधरी,रामदास साळवे, हरिभाऊ साळवे,जिजाभाऊ चिकने, नवनाथ गांजे,संजय शिरतार,संदीप चिकने,रामलाल राजदेव, पत्रकार विनोद गायकवाड, गणेश जगदाळे, श्रीनिवास शिंदे, संजय मोरे आदी उपस्थित होते.

शेवगांवला भगवान बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



शेवगांव : जनजाती गौरव दिनानिमित्त महान लोकनायक आणि क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती शेवगांव येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना भाजपा तालुकाध्यक्ष महेश फलके यांनी राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाने मागील दोन वर्षांत घेतलेल्या क्रांतिकारी निर्णयांचा पाढा वाचला. ते म्हणाले की, भगवान बिरसा मुंडा यांनी जल, जंगल, जमीन आणि आदिवासी बांधवांच्या स्वाभिमानासाठी दिलेला लढा आजही आपल्याला प्रेरणा देतो. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत शासनाने आदिवासी शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरणासाठी ऐतिहासिक पावले उचलली आहेत.

आश्रमशाळांमध्ये पवित्र पोर्टलद्वारे २५०० हून अधिक कायमस्वरूपी आणि ३००० हून अधिक कंत्राटी शिक्षकांची पारदर्शक भरती करण्यात आली असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी इतिहासात पहिल्यांदाच परिचारिकांची नियुक्ती केली आहे. तसेच पुढील वर्षापासून आश्रमशाळांमध्ये सेमी-इंग्रजी व सीबीएसई पॅटर्न सुरू होत आहे.

यासोबतच महिलांना स्वावलंबी करण्यासाठी 'राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना', तरुणांसाठी 'विशेष उद्योजकता विकास योजना' आणि कोलाम, कातकरी, माडिया व पारधी या आदिम जमातींसाठी विशेष निधी राखीव ठेवून शासनाने खऱ्या अर्थाने आदिवासी बांधवांना न्याय दिला आहे. या सर्व योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कार्यकर्ते कटिबद्ध आहोत.

या कार्यक्रमास महेश फलके, भिमराज सागडे, गणेश रांधवणे, संदीप खरड, नगरसेवक गणेश कोरडे, डॉ. निरज लांडे, खंडू बुलबुले, बापू धनवडे, सुभाष बरबडे, राहुल सावंत, अशोक ससाणे, योगेश बोडखे, सचिन आदमाने, किरण काथवटे , युवा मोर्चा अध्यक्ष सुधीर जायभाये, पिरमहंमद शेख, नारायण मडके, राजेंद्र घनवट, यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खरवंडी कासार दप्तर तपासणीवरून वाद

महिला अधिकाऱ्याला मानसिक त्रास दिल्याचा आरोप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



खरवंडी कासार : पाथर्डी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या खरवंडी कासार ग्रामपंचायतीच्या दप्तर तपासणीवरून वाद निर्माण झाला आहे

ग्रामपंचायत अधिकारी पूजा विश्वनाथ गायके यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दिली आहे. दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी दप्तर तपासणीदरम्यान विस्तार अधिकारी गिरे, कांडेकर व मनमाड यांनी अरेरावीची भाषा वापरून दमदाटी केली व कर्मचारी-ग्रामस्थांसमोर अपमानास्पद वर्तन केले, असा आरोप त्यांनी केला आहे. 'तुम्हाला नोकरी करायची आहे का? आमच्या म्हणण्याप्रमाणे केले नाही तर आमच्याशी गाठ आहे,' अशी धमकी दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकारामुळे मानसिक स्थिती बिघडून रक्तदाब वाढला. ग्रामपंचायत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचारासाठी अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात जाण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. सखोल चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी गायके यांनी केली आहे.

दुसरीकडे, विस्तार अधिकाऱ्यांनी दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी गटविकास अधिकाऱ्यांना अहवाल दिला आहे.

माहिती अधिकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष शैलेश जायभाये यांच्या तक्रारीनंतर तपासणी सुरू आहे. वारंवार मागणी करूनही अभिलेखे पूर्णपणे उपलब्ध होत नसल्याने व अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याने तपासणी अपूर्ण राहिल्याचे अहवालात नमूद आहे.

एकीकडे अभिलेखे मिळत नसल्याचा अहवाल, तर दुसरीकडे पदभारावेळी अभिलेखेच मिळाले नसल्याचे स्पष्टीकरण आणि मानसिक त्रासाचा आरोप, यामुळे हे प्रकरण चर्चेचा विषय ठरले आहे. वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी होणार का, याकडे लक्ष लागले आहे.

चांभुर्डीत मध्यरात्री चोरट्यांचा हैदोस!

घरात घुसून झोपेतल्या महिलांचे दागिने लुटले,कडीकोंडा तोडून तीन चोरट्यांची घरात एन्ट्री

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : घराचा दरवाजा तोडून थेट घरात प्रवेश करायचा, एकाच खोलीत झोपलेल्या महिलांच्या अंगावरील सोन्याचे दागिने हिसकावून घ्यायचे आणि अंधाराचा फायदा घेत पसार व्हायचे! असा धक्कादायक प्रकार श्रीगोंदा तालुक्यातील चांभुर्डी येथील ढगेवाडी परिसरात घडला आहे. मध्यरात्रीच्या सुमारास जर्किन घातलेल्या तीन अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून महिलांच्या अंगावरील तब्बल ५ लाख ३७ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले. घरात महिला झोपलेल्या असतानाच चोरट्यांनी दाखवलेल्या या निर्ढावलेल्या धाडसामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

सागर अशोक चव्हाण यांच्या कुटुंबातील सदस्य आणि त्यांची आत्या नलिनी जवार हे १५ नोव्हेंबर रोजी रात्री एकाच खोलीत झोपले होते. १६ नोव्हेंबरच्या पहाटे दोनच्या सुमारास घरात आवाज झाल्याने आई आणि आत्याला जाग आली. समोर जर्किन घातलेले तीन अनोळखी इसम दिसताच त्यांना धक्का बसला. चोरट्यांनी घराच्या दरवाजाचा कडीकोंडा तोडून घरात प्रवेश केला होता. या गोंधळात चोरट्यांनी महिलांच्या अंगावरील दागिने लंपास केले.



या चोरीत आत्याच्या गळ्यातील तीन तोळ्यांचे मंगळसूत्र व तीन ग्रॅमचे कर्णफूल, असा ४ लाख १२ हजार ५०० रुपयांचा ऐवज, तर आईच्या गळ्यातील एक तोळ्याचे मंगळसूत्र व कर्णफूल, असा १ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी नेला. घटनेनंतर फिर्यादीने डायल ११२ वर फोन करून पोलिसांना माहिती दिली. बेलवंडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून तीन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

घराचे दरवाजे तोडून चोरटे थेट महिलांच्या अंगावरील दागिने लुटत असतील, तर ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या तीन चोरट्यांचा शोध घेऊन पोलिस त्यांना कधी बेड्या ठोकणार, याकडे चांभुर्डी परिसराचे लक्ष लागले आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

बुधवार, दि.१८ नोव्हेंबर २०२६ । पान ८

तहसीलदारांकडून मुळा नदीपात्रालगत बेकायदेशीर मुरूम व कारगळ प्रकरणी १४ लाखांचा दंड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी शहरातील मुळा नदीपात्रालगत तसेच स्मशानभूमी परिसरात करण्यात आलेल्या कथित वाळूसाठा प्रकरणी राहुरी तहसील कार्यालयाने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात फिरोज इकबाल शेख, रा. राहुरी बुद्रुक यांना तब्बल १४ लाख १० हजार ९७४ रुपये भरण्याबाबत मागणीची नोटीस बजावण्यात आली आहे. तहसीलदार कार्यालयाकडून २ नोव्हेंबर २०२६ रोजी ही नोटीस जारी करण्यात आली आहे.

राहुरी बुद्रुक येथील गट क्रमांक ११ मधील स्मशानभूमीच्या दक्षिण बाजूने तसेच मुळा नदीपात्रालगत उत्तर बाजूने अंदाजे १०१.७६ ब्रास वाळूसाठा केल्याचा उल्लेख तहसील कार्यालयाने बजावलेल्या नोटिशीत करण्यात आला आहे. या प्रकरणी राहुरी तहसील कार्यालयाकडून गौणखनिज दंड आदेश क्रमांक कावि/गौम/५००/२०२६, दिनांक २७ जुलै २०२६ अन्वये संबंधित व्यक्तीकडे १४ लाख १० हजार ९७४ रुपये दंडाची रक्कम येणे बाकी असल्याचे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.



सदर नोटीस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची रक्कम आणि नोटीस खर्च भरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दिलेल्या मुदतीत रक्कम न भरल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १७४ अन्वये संबंधित व्यक्तीविरुद्ध थकबाकी वसुलीसाठी आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. तसेच थकबाकीच्या एक-चतुर्थांशापेक्षा अधिक नसलेली रक्कम अतिरिक्त दंड म्हणून आकारण्यात येऊ शकते, असेही नोटिशीत स्पष्ट करण्यात आले आहे.

या नोटिशीची प्रत ग्राम महसूल अधिकारी, राहुरी बुद्रुक यांना पाठविण्यात आली आहे. संबंधित नोटीस बजावून त्याची दिनांकासह स्वाक्षरी केलेली प्रत तहसील कार्यालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच संबंधित व्यक्तीच्या स्थावर व जंगम मालमत्तेचा तपशील आणि अहवाल कार्यालयास सादर करण्याबाबतही कळविण्यात आले आहे.

मुळा नदीपात्र आणि परिसरातील गौणखनिज उत्खनन व वाळूसाठ्याच्या विषयावर महसूल विभागाने घेतलेल्या या भूमिकेमुळे परिसरात चर्चेला सुरुवात झाली आहे. शासनाच्या गौणखनिज नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर आर्थिक दंडात्मक कारवाई होऊ शकते, हे या नोटिशीवरून स्पष्ट होत आहे. आता संबंधित व्यक्ती निर्धारित १५ दिवसांच्या मुदतीत दंडाची रक्कम भरते की महसूल विभागाकडून पुढील वसुलीची कारवाई केली जाते, याकडे राहुरीकरांचे लक्ष लागले आहे.

उक्कलगाव शिवारात कापसाची चोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

उक्कलगाव : श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव-खंडाळा हमरस्त्यालगत असलेल्या शेतातून अज्ञात चोरट्यांनी वेचणीला आलेला तब्बल (अंदाजे ५ ते ६) क्विंटल कापूस चोरून नेल्याची घटना घडली आहेत. पंचायत समितीचे माजी सभापती इंद्रनाथ पा.थोरात यांच्या शेतात ही चोरी झाली असून, या परिसरात सातत्याने होणाऱ्या चोऱ्यांमुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण पसरले आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की, माजी पंचायत समितीचे सभापती इंद्रनाथ पा.थोरात यांचे उक्कलगाव शिवारात गट नं. २९३ (माळ) येथे क्षेत्र आहेत. येथे त्यांनी कपाशीची लागवड केली होती.

या कापसाची केवळ एकच वेचणी झाली होती.मजूर तुटवडा आणि दिवाळी सणामुळे पुढील वेचणी काहीशी लांबणीवर पडली होती. थोरात हे हा कापूस वेचून घेण्याच्या तयारीत असतानाच, चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन संपूर्ण क्षेत्रातील कापूस वेचून लांबविला. सकाळी मजुरांना वेचणीसाठी शेतात आल्यावर हा प्रकार लक्षात आला. विशेष म्हणजे, गत दोन वर्षांपूर्वीही याच क्षेत्रातून थोरात यांचा कापूस चोरीला गेला होता.थोरातांचे निवासस्थान या क्षेत्रापासून लांबवर असल्यामुळे, नेमकी याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी पाळत ठेवून हा गुन्हा केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहेत.या परिसरात मागील काही दिवसांपासून भुरट्या चोरांनी उच्छाद मांडला आहे.

पटेलवाडी शिवारातून युवराज बाळासाहेब थोरात यांच्या घरासमोरून सोयाबीन चोरण्याचा प्रयत्न झाला होता.वाकण शिवारातून संदिप रावसाहेब थोरात यांच्या शेतातील उभ्या ट्रॅक्टरची बॅटरी चोरीला गेली होती. याआधीच्या एकाही चोरीचा तपास लागलेला नसतानाच, आता माजी सभापतींच्या शेतातून कापूस चोरीला गेल्याने परिसरातील इतर शेतकरी धास्तावले आहेत.या प्रकरणी थोरात यांनी बेलापूर पोलिसांना माहिती दिली असून, पोलिसांनी तातडीने या चोरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहेत.

प्रकाश चित्ते स्वगृही परतले

रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भाजपामध्ये प्रवेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



श्रीरामपूर : गेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी भाजपमधून बाहेर पडलेले आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत गेलेले भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते प्रकाश चित्ते यांनी पुन्हा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते त्यांनी मुंबईमध्ये भाजपाच्या संघटनात्मक बैठकीदरम्यान पक्षप्रवेश केला. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, अखिल भारतीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीच्या वेळी पक्ष विरोधी कारवाईचा ठपका ठेवत भारतीय जनता पार्टीने प्रकाश चित्ते यांना पक्षातून निलंबित केले होते. त्यानंतर काही काळ गप्प राहिलेले चित्ते नगरपालिका निवडणुकीच्या वेळी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत दाखल झाले. नगरपालिका निवडणूक त्यांनी शिवसेनेच्या नेतृत्वात लढवली. भाजप आणि शिवसेनेचे दोन वेगवेगळे उमेदवार उभे राहिल्याने महायुतीतील मत विभागणी चा फायदा काँग्रेसला होऊन करण ससाणे नगराध्यक्षपदी विजयी झाले. तेव्हापासून प्रकाश चित्ते शिवसेनेत फारसे सक्रिय नव्हते. आता त्यांनी पुन्हा भाजप पक्ष प्रवेश केला. त्यामुळे येत्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर मधील राजकीय समीकरणे पुन्हा बदलणार असल्याची चर्चा आहे.

बिंगो जुगार अड्ड्यांवर एलसीबीचे छापे; तिघे जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : शहरात अवैध धंद्यांचे जाळे पुन्हा एकदा उघड झाले आहे. बिंगो जुगार अड्ड्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई करत एकाच दिवशी शहरातील तीन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत तिघांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी दोन पथके तयार करून जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाईची मोहीम हाती घेतली. रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी या पथकाने श्रीगोंदा शहरातील अवधूतनगर, कुंभारगल्ली आणि सिद्धार्थनगर येथे बिंगो जुगार अड्ड्यांवर छापे टाकले. या कारवाईत अवधूतनगर येथील शुभम अरविंद दीक्षित याच्याकडून ३७ हजार १५० रुपये, कुंभारगल्ली येथील ऋषिकेश निंबराज हेंद्रे याच्याकडून २७ हजार ५५० रुपये, तर सिद्धार्थनगर येथील योगेश अनिल घोडके याच्याकडून ४५ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तिन्ही प्रकरणांत श्रीगोंदा पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, याच मोहिमेत नेवासा तालुक्यातील तरवडी येथेही विवेक पोपट पुंड याच्याविरुद्ध कारवाई करून १८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अशा प्रकारे जिल्ह्यातील चार ठिकाणच्या कारवाईत एकूण १ लाख २८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

घरपट्टी आल्यावर तात्काळ हरकत नोंदवा; स्नेहल खोरे यांचे आवाहन

श्रीरामपूरकरांसाठी करवाढ विरोधी मदत केंद्र सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : श्रीरामपूर नगरपालिकेकडून अंतिम कर आकारणी केलेल्या घरपट्टी व गाळापट्टीच्या बिलांचे वाटप सुरू झाले आहे. ज्या नागरिकांना वाढीव रकमेची घरपट्टी किंवा गाळापट्टी आली आहे, त्यांनी मुदतीत नगरपालिकेकडे हरकत नोंदवावी, असे आवाहन भाजपच्या विरोधी नगरसेविका स्नेहल केतन खोरे यांनी केले आहे. याबाबत माहिती देताना खोरे म्हणाल्या की, नगरपालिकेने काही महिन्यांपूर्वी नागरिकांना वाढीव घरपट्टी व गाळापट्टीच्या नोटिसा दिल्या होत्या. त्यावेळी हरकती नोंदविलेल्या नागरिकांनी आता अंतिम कर आकारणीचे बिल मिळाल्यानंतर पुढील ३० दिवसांच्या आत ५० टक्के रक्कम भरून आपली हरकत दाखल करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील कलम १६९ नुसार प्रांताधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती बहुमताने निर्णय घेऊन कर आकारणीत कपात करू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, वाढीव घरपट्टीविरोधात नागरिकांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी मोरया फाउंडेशनचे अध्यक्ष केतन खोरे यांनी हरिकमल प्लाझा, नगरपरिषदेजवळ, छत्रपती शिवाजी महाराज रोड येथे करवाढ विरोधी मदत केंद्र सुरू केले आहे. नागरिकांनी या केंद्राचा लाभ घेऊन अंतिम हरकत नोंदवावी, असे आवाहन खोरे यांनी केले.

देडगाव ग्रामपंचायतीच्या कारभाराची चौकशी करा!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बालाजी देडगाव : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव ग्रामपंचायतीच्या मागील तीन वर्षांतील आर्थिक व्यवहार आणि विकासकामांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात शहादेव दत्तात्रय मुंगसे यांनी १३ नोव्हेंबर रोजी माहिती अधिकार कायद्यांतर्गत ग्रामपंचायतीकडे अर्ज करून शासकीय निधीचा विनियोग, ग्रामसभेचे ठराव, विकासकामांची बिले, अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका तसेच बँक खात्यांचे विवरण मागविले आहे. मात्र, मागितलेली संपूर्ण माहिती उपलब्ध न झाल्याने ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, शहादेव मुंगसे आणि आदर्श हरिचंद साळवे यांनी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे निवेदन देऊन मागील तीन वर्षांतील विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. काही कामे प्रत्यक्षात न करताच खोटी बिले व कागदपत्रांच्या आधारे निधी काढला असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. मात्र, या आरोपांची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही.

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी निवडीनंतर डॉ. सुजय विखेंनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. सुजय विखे पाटील यांनी आज मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आशीर्वाद घेतले तसेच त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राची सद्यस्थिती, जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक सक्षम आर्थिक पाठबळ देणे, सहकारी संस्थांचे बळकटीकरण आणि ग्रामीण भागाच्या विकासात बँकेची भूमिका यासंदर्भात यावेळी चर्चा झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. सुजय विखे पाटील यांचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा



दिल्या. जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांच्या हातून चांगले काम घडावे, अशा अपेक्षाही व्यक्त केल्या. यावेळी झालेल्या भेटीत मुख्यमंत्र्यांनी दिलेले मार्गदर्शन आणि शुभेच्छा आपल्यासाठी महत्त्वाच्या असल्याची भावना डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली.

समान काम, समान वेतनासाठी श्रीरामपूर न्यायालयीन कर्मचारी संपावर

२२ महिन्यांपासून प्रस्ताव प्रलंबित



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : 'समान काम, समान वेतन' आणि सुधारित वेतनश्रेणीच्या मागणीसाठी श्रीरामपूर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील कर्मचारी मंगळवारपासून बेमुदत संपावर गेले आहेत. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या आदेशानुसार सुरू झालेल्या या आंदोलनामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम झाला आहे. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, ही कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. याबाबतचा प्रस्ताव उच्च न्यायालयाकडून शासनाकडे पाठविण्यात आला असून, गेल्या २२ महिन्यांपासून निर्णयाच्या प्रतीक्षेत असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.

राज्यातील चारही न्यायालयीन कर्मचारी संघटनांनी या संपात सहभाग घेतला असून, राज्यभरातील सुमारे ३४ हजार कर्मचारी आंदोलनात उतरले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील १,३०० हून अधिक कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत.

श्रीरामपूर न्यायालय परिसरात कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन करत आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. मागण्या मान्य करून अधिकृत शासन निर्णय जारी होईपर्यंत संप मागे घेणार नसल्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला. दरम्यान, श्रीरामपूर वकील संघाने या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

न्यायालयीन कामकाजावर परिणाम

कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपामुळे श्रीरामपूर न्यायालयातील प्रशासकीय कामकाजावर परिणाम झाला असून, विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासनाच्या निर्णयाकडे आता कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

गोरगरीब विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी 'राहुरी पॅटर्न' जिल्हाभर राबवा!

गटशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले यांचा प्रयोग दिशादर्शक | प्रयोगशाळा तपासणीत नऊपैकी आठ व्यापाऱ्यांचे गणवेश अपात्र

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

राहूरी : गोरगरीब विद्यार्थ्यांना शासनाच्या पैशातून मिळणारा गणवेश दर्जेदार आहे की केवळ नावालाच गणवेश दिला जात आहे, याची वस्तुस्थिती समोर आणण्याचे महत्त्वपूर्ण काम राहुरीच्या गटशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले यांनी केले आहे. गणवेशाची गुणवत्ता कागदोपत्री तपासण्याऐवजी थेट विद्यार्थ्यांच्या अंगावरील गणवेशाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून तपासणी करण्याचा त्यांनी अवलंबलेला पॅटर्न निश्चितच कौतुकास्पद आहे. या तपासणीत नऊपैकी तब्बल आठ व्यापाऱ्यांचे गणवेश गुणवत्तेच्या निकषात अपात्र ठरले. त्यामुळे कार्ले यांनी राबविलेला हा 'राहुरी पॅटर्न' आता संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात लागू करण्याची गरज निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने या प्रयोगाची दखल घेऊन जिल्हाभर एकसमान गुणवत्ता तपासणी मोहीम राबवावी, अशी अपेक्षा पालकवर्गातून व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना शासनाकडून गणवेश पुरविण्यासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च केला जातो. मात्र, या गणवेशाचा दर्जा तपासण्याची प्रक्रिया अनेकदा कागदोपत्रीच पूर्ण होत असल्याचे चित्र आहे. राहुरी तालुक्यात नऊ कापड व्यावसायिकांनी जिल्हा परिषद मराठी शाळांना गणवेश पुरवठा केला होता. गटशिक्षणाधिकारी जयश्री कार्ले यांनी या गणवेशाचे प्रत्यक्ष नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले.

त्यामध्ये केवळ एका व्यापाऱ्याचा गणवेश गुणवत्तेत पात्र ठरला, तर उर्वरित आठ व्यापाऱ्यांचे गणवेश अपात्र ठरल्याचा अहवाल शिक्षण विभागाला प्राप्त झाला. प्रत्यक्ष प्रयोगशाळा तपासणीमुळे गणवेशाच्या गुणवत्तेचे वास्तव उघड झाले. गणवेशाची गुणवत्ता तपासण्यासाठी शिक्षण विभागाने यापूर्वी केंद्रप्रमुखांना आदेश दिले होते. मात्र, या तपासणीनंतरही आठ व्यापाऱ्यांचे गणवेश प्रयोगशाळेत अपात्र ठरल्याने पूर्वीच्या तपासणी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. केंद्रप्रमुखांनी प्रत्यक्ष तपासणी केली होती की केवळ कादोपत्री अहवाल तयार केला होता, याची चौकशी होणे आवश्यक आहे. अद्याप एकाही केंद्रप्रमुखावर



कारवाई झालेली नाही.यापुढे कागदोपत्री तपासणीला पूर्णविराम देवून; प्रयोगशाळा तपासणी हाच पर्याय! स्वीकारला तर गोर गरीब विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतिचे गणवेश मिळतील.

जयश्री कार्ले यांनी मात्र प्रत्यक्ष नमुने प्रयोगशाळेत पाठवून गणवेशाचा दर्जा तपासण्याचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे केवळ कागदावर गुणवत्ता चांगली असल्याचे दाखविण्याऐवजी प्रत्यक्ष गुणवत्ता काय आहे, हे स्पष्ट झाले. हीच कार्यपद्धती जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात स्वीकारल्यास गणवेश पुरवठ्यातील त्रुटी वेळीच समोर येतील आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण गणवेशाच्या हक्काचे संरक्षण होईल. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधून विद्यार्थ्यांच्या गणवेशाचे नमुने स्वतंत्रपणे संकलित करावेत. ते मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत पाठवून कापडाची गुणवत्ता तपासावी. व्यापाऱ्यांनी पुरविलेल्या गणवेशाचा दर्जा, शाळांनी केलेली स्वीकृती आणि संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली तपासणी यांचा एकत्रित आढावा घ्यावा.

प्रयोगशाळेच्या अहवालानुसार दोषी पुरवठादारांवर कारवाई करावी. ही प्रक्रिया प्रत्येक वर्षी गणवेश वाटपानंतर राबविल्यास निकृष्ट गणवेश पुरविण्याला आळा बसेल.जिल्हाभर 'राहुरी पॅटर्न'! राबविल्यास निकृष्ट गणवेशाला आळा बसेल.

राहुरी पॅटर्न राबविण्यासाठी इच्छाशक्ती आणि पारदर्शक कार्यपद्धती आवश्यक आहे. राहुरीत कार्ले यांनी केलेला प्रयोग जिल्ह्यातील शिक्षण विभागासाठी दिशादर्शक ठरू शकतो. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या पद्धतीचा जिल्हास्तरावर स्वीकार करण्याची गरज आहे. राहुरीतील या प्रकरणाकडे केवळ आठ व्यापाऱ्यांचे गणवेश अपात्र ठरले एवढ्यापुरते न पाहता, त्यातून संपूर्ण जिल्ह्याला उपयोगी पडणारी गुणवत्ता तपासणीची व्यवस्था निर्माण करणे महत्त्वाचे आहे. जयश्री कार्ले यांनी राहुरीत दाखविलेला मार्ग जिल्हाभर स्वीकारला, तर शासनाच्या पैशातून विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने दर्जेदार गणवेश मिळू शकतील.

पी.एम.श्री शाळांची तपासणी का नाही?

राहुरी तालुक्यातील पी.एम.श्री केंद्र शाळांमधील गणवेशाचे नमुने तपासणीसाठी का घेण्यात आले नाहीत, असा सवाल उपस्थित होत आहे. सर्व शाळांना गुणवत्ता तपासणीचे समान निकष लागू असावेत. दुसरीकडे काही शाळांमधील विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश अद्यापही मिळालेला नाही. त्यामुळे निकृष्ट गणवेशाच्या जागी दर्जेदार गणवेश तातडीने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शिक्षण विभागाने घ्यावी.

'राहुरी पॅटर्न' नेमका काय?

विद्यार्थ्यांच्या अंगावरील गणवेशाचे प्रत्यक्ष नमुने घेणे, प्रयोगशाळेत गुणवत्ता तपासणे आणि अहवालानुसार पुढील कार्यवाही करणे. ही पद्धत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात राबविण्याची गरज आहे! राहुरी पॅटर्न मुळे सर्वच गरीब विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे गणवेश मिळतील.

नऊपैकी आठ व्यापाऱ्यांचे गणवेश अपात्र!

राहुरीत जि.प.शाळांना नऊ व्यापाऱ्यांनी गणवेश पुरविले. प्रयोगशाळा तपासणीत केवळ एकाच व्यापाऱ्याचा गणवेश पात्र ठरला, तर आठ व्यापाऱ्यांचे गणवेश अपात्र ठरले. त्यामुळे गुणवत्ता तपासणीचे महत्त्व अधोरेखित झाले.

जिल्हा परिषद शिक्षण विभागाने पुढाकार घ्यावा!

जयश्री कार्ले यांचा प्रयोग केवळ राहुरीपुरता मर्यादित न ठेवता जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये गणवेशाची प्रयोगशाळा तपासणी राबवावी. गोरगरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार गणवेश मिळण्यासाठी 'राहुरी पॅटर्न' जिल्ह्याचा आदर्श ठरावा.

निकृष्ट गणवेश स्वीकारणाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित करा!

नऊपैकी आठ व्यापाऱ्यांचे गणवेश अपात्र ठरले असतानाही संबंधित व्यापाऱ्यांवर अद्याप कारवाई झालेली नाही. निकृष्ट गणवेश शाळांनी स्वीकारलेच कसे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. गणवेश स्वीकारणाऱ्या शाळा व्यवस्थापन समित्या आणि मुख्याध्यापकांचीही जबाबदारी निश्चित करावी. तसेच पूर्वीची तपासणी करणाऱ्या केंद्रप्रमुखांची चौकशी करून दोष आढळल्यास कारवाई करावी.